**नेमणे आहे**

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com


# दैनिक जनता आवाज





अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०७ | शनिवार, दि. ०७ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### वकिलाने थेट बंदूकच काढली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** पुण्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असल्याचे दिसत आहे. पुणे शहर व परिसरात कोयता गँगने दहशत माजवली असून यावर अद्यापही पुणे पोलिसांना नियंत्रण आणता आले नाही. आणखी दुसरी गोष्ट म्हणजे येथील जमिनीचे वाद, याच जमिनीच्या वादातून एका वकिलाने थेट बंदूकच बाहेर काढल्याचा प्रकार समोर आला आहे.

### अपघातग्रस्त कारमध्ये कुजलेले मृतदेह

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शहापूर :** शहापूर तालुक्यातील उंबरमाळी गावाजवळ मुंबई-नाशिक महामार्गालगत झाडाझुडपात पडलेल्या कारमध्ये तिघांचे कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. हा अपघात चार ते पाच दिवसांपूर्वी झाल्याचा प्राथमिक अंदाज असून, मृतदेहांची स्थिती पाहून याचा अंदाज आला आहे. गुर चारण्यासाठी गेलेल्या महिलेला झाडांमध्ये गाडीसारखी गोष्ट असल्याचे दिसून आले आहे.

### ते प्रत्येक पीआयकडून पैसे घ्यायचे : दमानिया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** वैष्णवी हगवणे हुंडाबळी आत्महत्या प्रकरणी अडचणीत सापडलेले आयपीएस जालिंदर सुपेकर यांच्यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आणखी एक नवा आरोप केला आहे. जालिंदर सुपेकर हे प्रत्येक पोलिस उपनिरीक्षकाकडून पैसे घ्यायचे. एवढेच नव्हे तर दरवर्षी दिवाळीला ते त्यांच्याकडून १ तोळा सोनेही घ्यायचे, असे ते म्हणालेत.




# ... पंतप्रधान मोदींनी फडकाविला तिरंगा झेंडा

## आजपासून वंदे भारत ट्रेन सुरू होणार

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीनगर : काल शुक्रवारी कटरा येथे पंतप्रधान मोदी म्हणाले की, मुख्यमंत्री ओमर देखील सातवी-आठवीपासून काश्मीरला रेल्वेशी जोडणारा प्रकल्प पूर्ण होण्याची वाट पाहत होते. ते म्हणाले की, लोक फ्रान्समधील आयफेल टॉवर पाहण्यासाठी जातात, आता लोक चिनाब आर्च ब्रिज पाहण्यासाठी काश्मीरमध्ये येतील. हा पूल स्वतःच एक पर्यटन स्थळ बनेल. लोक सेल्फी पॉइंटवर सेल्फी घेतील.**



तत्पूर्वी, पंतप्रधानांनी जम्मूच्या रियासी जिल्ह्यात चिनाब नदीवर बांधलेल्या जगातील सर्वात उंच रेल्वे चिनाब आर्च ब्रिजचे तिरंगा फडकावून उद्घाटन केले. त्यानंतर त्यांनी कटरा येथे अंजी ब्रिज आणि काश्मीरची पहिली ट्रेन वंदे भारतला हिरवा झेंडा दाखवला.

उत्तर रेल्वे ७ जूनपासून कटरा-श्रीनगर मार्गावर वंदे भारत ट्रेन सेवा सुरू करणार आहे. आयआरसीटीसी वेबसाइटवर तिकीट बुकिंग करता येईल. कटरा आणि श्रीनगर दरम्यान आठवड्यातून ६ दिवस दोन गाड्या धावतील.

उत्तर रेल्वेने सांगितले की, ट्रेनमध्ये दोन प्रवास वर्ग आहेत. चेअर कारचे भाडे ७१५ रुपये आणि एक्झिक्युटिव्ह क्लासचे भाडे १३२० रुपये आहे. सध्या गाड्या फक्त बनिहाल येथे थांबतील, इतर थांब्यांचा निर्णय नंतर घेतला जाईल.

पंतप्रधान म्हणाले, दहशतवादामुळे जम्मू-काश्मीरच्या लोकांसाठी त्यांच्या पसंतीचे प्रतिनिधी निवडणे एक आव्हान बनले होते. वर्षानुवर्षे दहशतवाद सहन केल्यानंतर, जम्मू-काश्मीरने इतका विनाश पाहिला की लोकांनी स्वप्न पाहणे सोडून दिले. त्यांनी दहशतवादाला आपले भाग्य म्हणून स्वीकारले होते. आम्ही ते बदलले आहे. आज येथील तरुणही नवीन स्वप्ने पाहत आहेत. लोकांना जम्मू-काश्मीर पुन्हा चित्रपट आणि खेळांचे केंद्र बनताना पहायचे आहे. आम्ही हे माता खीर भवानीच्या मेळ्यातही पाहिले.

ते म्हणाले की, अमरनाथ यात्रा ३ तारखेपासून सुरू होत आहे. ईदचे वातावरण देखील आहे. दहशतवादी हल्ल्यामुळे हे सर्व डळमळीत होणार नाही. नरेंद्र मोदी यांनी वचन दिले आहे की ते विकास थांबवू देणार नाहीत. जर काही अडथळा आला तर त्याला मोदींना सामोरे जावे लागेल. आज ६ जून आहे. एक महिन्यापूर्वी, ६ मे च्या रात्री, पाकिस्तानचा नाश झाला होता. जर पाकिस्तानने कधी ऑपरेशन पान ४

### १० तासांचा प्रवास सुमारे ३ तासांत

१० तासांचा प्रवास सुमारे ३ तासांत पूर्ण होईल. स्वातंत्र्याच्या ७७ वर्षांनंतरही, हिमवर्षावाच्या काळात काश्मीरचा देशाच्या इतर भागापासून संपर्क तुटलेला राहतो. राष्ट्रीय महामार्ग-४४ बंद असल्याने, खोऱ्यात जाण्याचा मार्ग बंद आहे. याशिवाय, जम्मू ते काश्मीर रस्त्याने प्रवास करण्यासाठी ८ ते १० तास लागायचे. ट्रेन सुरू झाल्यामुळे, हा प्रवास सुमारे तीन तासांत पूर्ण होईल.

# शिवरायांच्या जयघोषाने गड दुमदुमला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**रायगड :** शिवराज्याभिषेक दिनानिमित्त किल्ले रायगडावर आज दैदिप्यमान सोहळा पार पडत आहे. ३५१ वर्षांपूर्वी याच दिवशी, ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. या ऐतिहासिक सोहळ्याच्या स्मरणार्थ गडावर लाखो शिवभक्तांनी उपस्थिती लावली असून, राजसदरेपासून जगदीश्वर मंदिरापर्यंत जयघोषांनी संपूर्ण गड दुमदुमून गेला आहे.



युवराज शहाजी राजे भोसले यांनी राजेशाही पोशाखात रोपवे मार्गे पायऱ्यांद्वारे राजसदरेवर आगमन केले आहे. गडावरून 'राजांना मुजरा' करण्यासाठी देशभरातून आलेल्या ३ ते ४ लाख शिवभक्तांनी गडावर हजेरी लावली. यानंतर युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक घालण्यात आला.

२२ मंडप, ५०० लिटरच्या ५० टाक्या, १ लाख पाण्याच्या बाटल्या, ८ आरओ यंत्रं, १५ ठिकाणी वैद्यकीय पान ४

# पंधरा बस मिळण्यासाठी प्रयत्नशील : आ. लंघे



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा बस आगाराला अजून पंधरा बस मिळण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आ. विठ्ठलराव लंघे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नेवासा आगारात पाच नव्या एसटी बस दाखल झाल्या. या बसेसचे सेवार्पण आ. लंघे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी एसटी डेपो मॅनेजर प्रशांत होले यांनी प्रास्ताविक करून स्वागत केले. प्रवासी वाहतूक संघटनेचे अध्यक्ष व भाजप नेते अनिल ताके यांनी प्रास्ताविकात त्यांनी या पाच गाड्या मिळविण्यासाठी आ. लंघे यांच्यासह प्रवासी संघटनेने आणि नेवासा प्रेस क्लब बातम्यांच्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांचे हे यश असल्याचे सांगितले. तसेच लवकरच अजून पंधरा गाड्या मिळाव्यात आणि देवगड पंढरपूर ही नेवासा तीर्थक्षेत्रासाठी आवश्यक असलेली बस सुरू करून पुन्हा बंद करू नये, अशी मागणी केली.

आ. लंघे पुढे म्हणाले की, लाल परी ही एकमेव ग्रामीण भागातील दळणवळणाचे पान ४

> नेवासा डेपोच्या उभारणीमध्ये आमदारांचे वडील कै. वकीलराव लंघे यांचे आणि मधुकरराव देशपांडे, रामभाऊ पठाडे, कैलास शिंदे, अशोक डहाळे, कै. नारायणराव पतंगे यांचे योगदान होते. डेपोसाठी नवीन गाड्या आणि कमी असलेला स्टाफ मिळण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहे.
>
> **- विठ्ठलराव लंघे, आमदार**

# ... आता विशाळगडावर सण साजरा करण्यास मनाई

## जिल्हा प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांना सुप्रीम कोर्टात दिले आव्हान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हापूर :** कोल्हापूरच्या पोलिस अधीक्षकांनी विशाळगडावर कोणताही सण किंवा उत्सव साजरा करण्यास मनाई केली आहे. उद्याच्या बकरी ईदच्या पार्श्वभूमीवर पोलिस प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे येथे मोठा तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने २ दिवसांपूर्वी विशाळगडावर बकरी ईदची कुर्बानी देण्यास परवानगी दिली होती. त्यापूर्वी केवळ उरुसावेळी स्थानिकांना अशी कुर्बानी देण्यास परवानगी होती. पण कोर्टाच्या आदेशामुळे यावेळी भक्तानाही कुर्बानी देण्यास परवानगी मिळाली होती. पण आता कोल्हापूरच्या पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता यांनी संभाव्य तणाव लक्षात घेता विशाळगडावर कोणताही सण किंवा उत्सव साजरा करण्यास मनाई केली आहे.



> गतवर्षी १४ जुलै रोजी विशाळगडावरील अतिक्रमण काढण्याच्या मुद्यावरून मोठी दंगल घडली होती. त्यानंतर काही काळ पर्यटकांना गडावर जाण्यास बंदी घालण्यात आली होती. नंतरच्या काळात कुर्बानी देण्यावरही नियंत्रण आले. त्यानंतर विशाळगडावर झालेल्या उरुसावेळी फक्त स्थानिकांनाच कुर्बानी देण्याची परवानगी देण्यात आली. त्यानंतर आता हायकोर्टाने सदर ठिकाणी सर्वांना कुर्बानी देण्यास परवानगी दिली. पण कोल्हापूर पोलिसांनी या प्रकरणी विरोधाभासी भूमिका घेत विशाळगडावर कोणताही सण किंवा उत्सव साजरा करण्यास मनाई केली.

विशेषतः जिल्हा प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांना सुप्रीम कोर्टात आव्हान दिले आहे. त्यामुळे उद्या बकरी ईदच्या दिवशी काय होणार? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कोल्हापूर प्रशासनाने विशाळगडावर कुर्बानी पान ४

# 'कृषी'च्या बियाण्यांचा लाभ घ्यावा : आ. काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांनी अनुदानित बियाणे मिळावीत, यासाठी महाडीबीटी पोर्टल या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरलेले होते. त्या पात्र शेतकऱ्यांना कृषीविभागाच्या वतीने अनुदानित बियाण्याचे वाटप सुरू करण्यात आले असून लाभधारक शेतकऱ्यांनी अनुदानित बियाण्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी केले आहे.



राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने पात्र लाभार्थी शेतकऱ्यांना प्रमाणित अनुदानित बियाणे शंभर टक्के अनुदानावर मोफत दिले जातात. शेतकऱ्यांना आवश्यक असलेली बियाणे मोफत उपलब्ध व्हावीत. यासाठी पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी अर्ज करणे गरजेचे आहे. त्यानुसार कृषी विभागाने निर्देशित केलेल्या महाडीबीटी पोर्टल या संकेतस्थळावर शेतकऱ्यांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यात आले होते.

यापैकी अर्ज मंजूर झालेल्या शेतकऱ्यांना एकूण ५० लाख रुपयांचे प्रमाणित केलेले अनुदानित बियाणे कोपरगाव तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी उपलब्ध झाले असून या बियाणांचे वितरण सुरू करण्यात आले आहे. यामध्ये ३३५ क्विंटल फुले दूर्वा या वाणाचे सोयाबीन बियाणे उपलब्ध आहे.

हे बियाणे शेतकऱ्यांना मोनगिरी कृषी दीपक कृषी सेवा केंद्र कोपरगाव, कोपरगाव खरेदी विक्री संघ कोपरगाव, कृषीधन कृषी सेवा केंद्र कोपरगाव व मंजूर प्रगत विविध पान ४

> १७० हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन पिक, ४० हेक्टर क्षेत्रावर तुर व सोयाबीन तसेच २० हेक्टर क्षेत्रावर भुईमूग पिकासाठी पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी शेतकरी गटांनी देखील आपले अर्ज ऑनलाइन पद्धतीने लवकरात लवकर दाखल करावे.
>
> **- आशुतोष काळे, आमदार**

# आ. किरण लहामटेंच्या उपस्थितीत गुणगौरव सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजुर येथे शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थी तसेच शिक्षकांचा गुणगौरव सोहळा आ. डॉ. किरण लहामटे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये संपन्न झाला.

प्रकल्पांतर्गत असलेल्या २१ शासकीय व १७ अनुदानित आश्रमशाळांमधून गुणानुक्रमे प्रथम आलेल्या इयत्ता १० वीतील प्रत्येकी ३ विद्यार्थी, विद्यार्थीनी, इयत्ता १२ वी विज्ञान व कला शाखेतील प्रत्येकी ३ विद्यार्थी, विद्यार्थीनी अशा एकुण १८ विद्यार्थी, विद्यार्थीनींचा रोख बक्षिस, प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन डॉ. लहामटे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. तसेच शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला. आयुष्यामध्ये मोठी स्वप्ने पाहून स्वप्नांच्या पूर्ततेचा ध्यास अंगी बाळगावा. पान ४

# एसपींचा आदेश अन् कत्तलखाने उद्ध्वस्त

## तिसगावच्या सहा कत्तलखान्यावर पोलिसांची धडक कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** गो-हत्या कायद्याची अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश नवनिर्वाचित जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी पोलीस प्रशासनाला दिल्यानंतर पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथील कसाब वाड्यातील पाच ते सहा अनाधिकृत कत्तलखाने गुरुवारी मध्यरात्री पोलिसांनी जमीनदोस्त केले आहेत.

> **पोलीस पथक लक्ष ठेवणार**
>
> बकरी ईदच्या दिवशी, त्याचबरोबर त्यापुढील काळातही तालुक्यातील पोलीस पथक गो-हत्या करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. त्यामुळे कायदा नियम मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे, असे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी सांगितले.

या कारवाईचे गोरक्षकांसह हिंदू समाज बांधवांकडून स्वागत केले जात असले, तरी कायदे नियमांचे तंतोतंत पालन करून तिसगावमध्ये गोहत्या सारख्या घटना कदापिही खपवून घेतल्या जाणार नाहीत. गोहत्या करणाऱ्यांवर पोलीस प्रशासन कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा पान ४

# शिवरायांच्या राष्ट्रप्रेमाचा आदर्श घ्या

## आ. संग्राम जगताप; छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त अभिवादन

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर : स्वराज्याचे संस्थापक आणि रयतेचे राजा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या राज्याभिषेक दिनानिमित्त आ. संग्राम जगताप यांनी शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**



यावेळी आ. जगताप यांनी महाराजांच्या पुतळ्यास नमस्कार करत त्यांच्या विचारांप्रती श्रद्धा व्यक्त केली.

आ. जगताप यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज हे आदर्श नेतृत्व, दूरदृष्टी, आणि लोक कल्याणकारी शासनाचे प्रतीक आहेत. आजच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत आवश्यकता आहे. तरुण पिढीने त्यांच्या शौर्य, नितिमत्ता आणि राष्ट्रप्रेम याचा आदर्श घ्यावा. छत्रपती शिवाजी महाराज यांनी रयतेचे राज्य निर्माण केले. त्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सोडविण्याचे काम केले, राज्याभिषेक सोहळा हा रायगड किल्ल्यावर पार पडला आणि त्यानंतर मराठा साम्राज्याने अटकेपार झेंडा लावला, राज्यभिषेक सोहळा हा एक संस्कार आहे आणि तो सर्वांनी अंगीकारावे.

> छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे नूतनीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. भव्य दिव्य असा पूर्णकृती पुतळा उभारला जाणार आहे. विकसित शहर निर्माण होत असून उड्डाणपुलाच्या कामाची त्यामध्ये भर पडली आहे. ज्याप्रमाणे तिथीनुसार शिवजयंती साजरी केली जाते. त्याचप्रमाणे राज्यभिषेक सोहळा ही ९ जूनला तिथीनुसार होणार आहे. तरी शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करावा, असे आवाहन आ. संग्राम जगताप यांनी केले.

यावेळी प्रा. माणिकराव विधाते, सुरेश बनसोडे, अभिजीत खोसे, सुमित कुलकर्णी, संतोष लांडे, दिनेश जोशी, आनंद पुंड, मयूर बांगरे यांच्यासह शिवप्रेमी नागरिक, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भगवा ध्वज फडकावून शिवरायांचे केले स्मरण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२ व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त निंभेरे ग्रामपंचायत कार्यालयात दिन विशेष उत्साही वातावरणात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी ग्रामपंचायत आवारात भगवा ध्वज फडकावण्यात आला आणि शिवछत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

या ऐतिहासिक सोहळ्याचे पौरोहित्य प्रसादशास्त्री कुलकर्णी यांनी पार पाडले. त्यांनी वैदिक मंत्रोच्चारासह शिवराज्याभिषेक पूजन केले आणि उपस्थितांना शिवचरित्राची प्रेरणा देणारे विचार मांडले.

निंभेरे गावातील शिवप्रेमी सरपंच शांताराम भाऊसाहेब सिनारे, तसेच रामायणाचार्य मानोहर महाराज सिनारे, बबनराव महाराज सिनारे, नवनाथ चोपडे, सतीश सिनारे, अभिजीत सिनारे, अनिल मांढरे, ऋषिकेश सिनारे, सिद्धू सिनारे, शरद सिनारे, पप्पू गिरी, विजय सिनारे, रविंद्र सिनारे आदी मान्यवर उपस्थित होते.

# सरकारकडून क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे काम

## मंत्री चंद्रशेखर बावनकुळे; शेवगावमध्ये देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धा उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आपले सरकार क्रीडा धोरण पुढे घेऊन जात आहे. गावा-गावात खेलो इंडियाच्या माध्यमातून क्रीडा क्षेत्राला चालना देण्याचे काम सरकार करत आहे. सर्व जिल्ह्यातील गावागावातून विविध खेळाचे चॅम्पियन तयार झाले पाहिजे, क्रीडा क्षेत्राला महत्त्व देऊन क्रीडा धोरणाचे नियोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.



शेवगाव येथे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी बावनकुळे बोलत होते.

खंडोबा मैदानावर झालेल्या या स्पर्धेसाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, आ. विठ्ठलराव लंघे पाटील, प्रताप ढाकणे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे, जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे, नाना डोंगरे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, नंदू मुंढे, अर्जुन शिरसाठ, फारुक पटेल आदींसह संयोजन समितीचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राम शिंदे यांची कुस्ती थोड्यावरून हुकली, थोडी कुस्ती राहिली होती. त्यांच्या विरोधात जिल्ह्यात काही शक्ती घुसू पाहत आहे, षडयंत्र करून त्यांना कमजोर करण्याचा प्रयत्न केला गेला, मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांना सभापती केल्याचा टोला मंत्री बावनकुळे यांनी विरोधकांना लगावला.

जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कुस्ती स्पर्धेचे अवघड नियोजन उत्तम प्रकारे करुन शेवगावमध्ये घेण्यात आलेल्या देवाभाऊ केसरी कुस्ती स्पर्धेच्या आयोजनाचे कौतुक केले. तर जिल्ह्यासह राज्यातून आलेल्या खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

> राज्यासह देशात लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जन्मशताब्दी सोहळा साजरा होत असताना वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच कॅबिनेटची बैठक चोंडीला घेऊन १० हजार कोटीचे कामे मंजूर करण्यात आली. देशात ५ हजारापेक्षा अधिक कार्यक्रम घेण्यात आले.
>
> **– चंद्रशेखर बावनकुळे, महसुल मंत्री**

> एप्रिल, मे महिन्यात शेवगाव, पाथर्डी भागात जनावरांचा चारा, पाणी व टँकरचा प्रश्न उद्भवतो, मात्र देवाभाऊ कुस्ती स्पर्धेचे आयोजन केल्यानंतर मोठ्या प्रमाणात पाऊस होवून ही स्पर्धा पुढे ढकलण्याची वेळ आली. चांगला पाऊस झाल्याने चारा, पाणी व टँकरचा प्रश्न सुटून आनंदाचा क्षण या भागात निर्माण झाला आहे. या कुस्ती स्पर्धेत तीन महाराष्ट्र केसरी व आंतरराष्ट्रीय महिला कुस्तीपटूसह राज्यातून मल्ल सहभागी झाले, ही आनंदाची बाब आहे.
>
> **– प्रा. राम शिंदे, सभापती**

# ग्रामस्थांकडून वृक्ष संवर्धनाचा संकल्प

## निमगाव वाघात वृक्षरोपणाने पर्यावरण दिवस साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील निमगाव वाघा येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिवस वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला.

संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात वृक्षारोपण करुन पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. यावेळी डोंगरे संस्थेचे अध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे, चंद्रकांत जाधव, डॉ. विजय जाधव, बाबूराव जाधव, बबन जाधव, विशाल निमसे, संदीप डोंगरे, संजय जाधव, डॉ. संदीप जाधव, लक्ष्मण चौरे, सुरेश जाधव, जयंत जाधव आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामस्थांनी लावलेली झाडे जगविण्यासाठी वृक्षसंवर्धनाचा संकल्प घेतला. या उपक्रमासाठी मेरा युवा भारत अहिल्यानगरचे जिल्हा युवा अधिकारी सत्यजीत संतोष, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे व महाराष्ट्र राज्य ग्रंथालय विभागाचे संचालक अशोक गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

> पर्यावरण हा जागतिक प्रश्न बनला असून, वृक्षारोपणाशिवाय पर्याय राहिला नाही. वृक्ष जगले तर सजीव सृष्टी वाचणार असल्याने, प्रत्येकाने वृक्षरोपण करणे काळाची गरज बनली आहे. काही क्षणिक सुखांसाठी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. आपल्या पुढील वंशाचे अस्तित्व वृक्षरोपण व संवर्धनावर अवलंबून आहे. पर्यावरणाचे समतोल बिघडल्याचा फटका शेतकऱ्यांना देखील बसला आहे. अनेक नैसर्गिक संकटांना सामोरे जावे लागत आहे.
>
> **– नाना डोंगरे**

# महिको सिड्स कंपनीकडून वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** तालुक्यातील लाडजळगाव येथे राष्ट्रीय पर्यावरण दिनाच्या निमित्ताने बी-बियाण्यांच्या महिको सिड्स या कंपनीकडून पर्यावरण विषयी जनजागृती संवाद साधून लाडजळगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या प्रांगणात वड, करंज, पिंपळ आदी प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात केले.



यावेळी लोकनियुक्त सरपंच अंबादास ढाकणे यांनी प्रास्ताविक केले. झाड फाउंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष संजय आंधळे यांनी वृक्षरोपन व संवर्धन याबाबत माहिती दिली महको सीड्सचे विकास कराळे तसेच कृषी सहाय्यक किशोर वाबळे यांनी सेंद्रिय शेती बाबत मार्गदर्शन केले.


यावेळी उपसरपंच विशाल पाटील, वसंत वीर, विठ्ठलराव ढाकणे, झाड फाउंडेशनचे सचिव बाबा डोंगरे, सदस्य सुरेश फुंदे, जालिंदर बर्डे, अकबर शेख, सोपान पाटील, रामेश्वर पाटील, बाळू पादर, बबन कराड यांच्यासह आदी ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार महीको सीड्स कंपनीचे दीपक ढाकणे यांनी मानले.

> राष्ट्रीय हवामान संघटनेने तापमान वाढीचा दिलेला इशारा विचार करायला लावणारा असून प्रत्येकाने झाडे लावून त्याचे संवर्धन करावे. आज प्रत्येक ठिकाणी वृक्ष लागवडीचे तुलनेत वृक्ष तोडीचे प्रमाण जास्त आहे. शासनाने वृक्ष तोड थांबण्यासाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज असून झाड फाउंडेशन लाडजळगाव तेथे मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणचे काम करणार आहे.
>
> **– संजय आंधळे, अध्यक्ष : झाड फाउंडेशन**

# ... अखेर जामखेडमधील मटका पेढ्या बंद ?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड शहरात अवैध धंदे सुरू असल्याच्या बातम्या प्रसिद्ध होताच अनेक ठिकाणच्या मटक्याच्या टपऱ्या बंद होत्या. मात्र काही ठिकाणी अजूनही राजरोसपणे मटका सुरू आहे. त्यामुळे बातम्या मुळे प्रशासनाने थातूरमातूर कारवाई केल्याचे दिसून येत आहे. तर काही ठिकाणी मटका पेढीवाले प्रशासनाच्या आदेशाला न जुमानता मटका घेतच आहेत.



दोन दिवसांपासून कलाकेंद्र नियोजित वेळेत बंद होत आहेत. मात्र कलाकेंद्रात कलेऐवजी डीजेच्या थयथयाट, कर्णकर्कश आवाज सुरूच आहे. परिसरात मोठ्या प्रमाणावर वेश्या व्यवसाय सुरू आहे. रात्रंदिवस परिसरातील अनेक हॉटेलवर ऑनकॉल मुलींना बोलावले जाते. तसेच कलाकेंद्रात संपूर्ण राज्यभरातील हवसे, नवसे, गवसे यांचा राजरोसपणे कलाकेंद्रात वावर असतो. अनेक गुन्हेगार या ठिकाणी आश्रय घेतात.

जामखेड शहर व तालुक्यात मटका, जुगार, दारू असे अवैध धंदे खुले आम चालू आहे. मटका जुगारामुळे अनेकांचे संसार मोडले आहे. खुले आम चालू असलेल्या या अवैध धंद्याचा कधी बिमोड होणार अशी नागरिकांमध्ये चर्चा आहे. कोणाच्या आशिर्वादाने हे अवैध धंद्याना अभय मिळत आहे. हेच खरे कोडे आहे.

> जामखेड शहर व तालुक्यात किरकोळ कारणावरून गोळीबार सारखे घटना घडत आहेत. हाणामाऱ्या ही नित्याची बाब झाली आहे. गुंडगिरी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. कर्णकर्कश आवाजाचे हॉर्न, दुचाकीचे सायलेंसर काढून मोठ्याने होणारे आवाज, कट मारणे असे प्रकार होत आहेत. अनेक दोन नंबर करणारे व्हॉईट कॉलर जोमात धंदे करीत आहे व यांना आशिर्वाद कोणाचा भेटत आहे, अशी चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

# श्रीरामपुरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५१ वा शिवराज्याभिषेक दिन श्रीरामपूर अखंड मराठा समाजाच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून वंदन करण्यात आले.

अखंड मराठा समाज श्रीरामपूरच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित मराठा बांधवांनी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून वंदन करण्यात केले.

रायगडावर ३५० वर्षांपूर्वी राज्याभिषेकाच्या वेळी शिवाजी महाराजांनी छत्रपती हे पद धारण केले होते. त्याचबरोबर एका सार्वभौम राज्याची घोषणा केली होती. त्यामुळे महाराजांचा राज्याभिषेक हा अत्यंत व्यापक आणि भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा प्रसंग होता. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिन भावी पिढीला मार्गदर्शक ठरणारा असल्यामुळे अखंड मराठा समाजाने त्यांच्या आदर्शाचे पालन करण्याचे काम सुरू ठेवले आहे.

> पंडितराव बोंबले, अण्णासाहेब डावखर, प्रमोद भोसले, ड. बाळासाहेब आगे, नागेश सावंत, सुरेश कांगुणे, राजेंद्र मोरगे, शरद नवले, सुधाकर बोंबले, जयवंत घोडके, नितीन गवारे, संदीप बोंबले, समीर बोर्डे, नितीन कासार, संदीप बोंबले, संजय बोंबले, रमेश घुले, अतुल साळवे, गाडे पाटील, राजेंद्र दाणे, गणेश राशिनकर, अमोल बोंबले आदी उपस्थित होते.

# ...आता 'दिव्यांग सक्षमीकरण' ला डीडीओ कोड प्राप्त ?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागा मधून दिव्यांग कल्याण २९ नोव्हेंबर २०२२ मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार व सामान्य प्रशासन विभाग १५ डिसेंबर २०२२ च्या अधिसूचनेनुसार दिव्यांग कल्याण विभाग स्वतंत्र करण्यात आला. त्याकरिता आयुक्त, प्रादेशिक, ज़िल्हा, तालुका स्तरावरील कार्यालयासाठी एकूण १९९६ पदाची निर्मिती करण्यात आली.

डिसेंबर २०२२ ला अधिकृत अधिसूचना निघून सुद्धा अंमलबजावणी करिता १ मे २०२५ चा मुहूर्त मिळाला तोपण राज्यातील प्रायोगिक तत्वावर तर फक्त १३ जिल्हा करिता. नवीन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली.पूर्ण क्षमतेने कार्यालय सुरू करणे असा आदेश प्राप्त झाला. परंतु कुठल्याही पूर्ण क्षमतेने कार्यालय सुरू झाले नाही.

कारण जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी यांना डी. डी. ओ कोडचा अधिकार प्राप्त न झाल्यामुळे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, कर्मचारी जीपीएफ बिले, सेवानिवृत्ती उपदान बिले, वैद्यकीय बिले व दिव्यांग कल्याण विभागाच्या कुठल्याही योजना राबविण्याचा अधिकार प्राप्त झाला नाही. पूर्ण मे महिना वाट बघून सुद्धा कुठलाही अधिकार प्राप्त न झाल्यामुळे दिव्यांग शाळेतील कर्मचारी व दिव्यांग बांधव संभ्रमावस्थेत होते.

मात्र काही दिवसानंतर दिव्यांग सक्षमीकरण कार्यालयास डीडीओ कोड प्राप्त झाल्याने १३ जिल्ह्यातील कर्मचारी व दिव्यांग बांधवामध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. दिव्यांग शाळा शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी संघटना अहिल्यानगर यांचे सर्वांनी विशेष आभार मानले आहे. याकरिता संघटनेचे अध्यक्ष संजय साळवे, उपाध्यक्ष चांगदेव खेमनर, खजिनदार प्रदीप भोसले, श्रीरामपूर मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष जोशी, नागनाथ शेटकर, रमेश टिक्कल, ज्ञानदेव जाधव यांचे विशेष सहकार्य लाभले.

# लोणी बुद्रुकमध्ये एसटीचा वर्धापनदिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**प्रवरानगर :** महाराष्ट्र राज्य एसटी महामंडळाच्या ७७ वा वर्धापन दिन लोणी बुद्रुक आगारात गुलाबपुष्प व पेढे देऊन साजरा करण्यात आला.

याप्रसंगी वाहतूक अधिकारी सौ. ढगे, वाहतूक नियंत्रक रावसाहेब पर्वत, सरपंच लक्ष्मण बनसोडे, राहुल धावणे, मधुकर विखे, खंडू धावणे, अनिल विखे, प्राचार्य सोपान विखे, एन. डी. विखे, अनिल विखे, लक्ष्मण विखे, राजेंद्र मते आदी मान्यवरांच्या उपस्थितीत वर्धापन दिन सोहळा पार पडला. याप्रसंगी प्रवाशांनी सुद्धा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# ...तर हिंदूंनी त्यांच्यावर बहिष्कार टाकावा

## सागर बेग; बारागाव नांदूर येथे स्वराज्यध्वजाच्या चौथरा बांधकामाची केली पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** जिहादी प्रवृत्तीच्या मुसलमानांकडून आदिवासींच्या जमिनी दबंगगीरीने हडपण्याचे प्रकार बारागाव नांदूर परिसरात यापूर्वी खूप झाले असून तेच जिहादी आज ग्रामपंचायतीचा बहुमताने ठराव असून सुद्धा स्वराज्यध्वजाला विरोध करत असतील तर हिंदूंनी त्यांच्यावर बहिष्कार टाकावा, असे परखड आवाहन राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांनी केले आहे.




राहुरी तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाचे गाव म्हणून ओळखले जाणाऱ्या बारागाव नांदूर गावात गेल्या अनेक वर्षांपासून स्वराज्यध्वज उभारणीचा वाद उफाळलेला होता. मार्च महिन्यात विरोधाकांना धुडकावून सागर बेग यांनी स्वराज्यध्वज उभारणीला प्रत्यक्षात सुरुवात केली. मुसलमानांच्या तीव्र विरोधाला न जुमानता स्थानिक हिंदूंनी राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्यध्वजाला ग्रामपंचायत ठरावाद्वारे बहुमताने परवानगी मिळवली.

परवानगीलाही न जुमानता जिहादी मुस्लिम ध्वजाला विरोध करतच होते. अखेर गावातील हिंदू ऐक्याचा व सागर बेग यांनी दिलेल्या पाठबळाला यश आले आणि त्याठिकाणी उभारलेल्या स्वराज्यध्वजाच्या चौथरा पायाभरणीचे कामाचा व चौथरा बांधकामाची पाहणी करून नारळ फोडण्याचा कार्यक्रम करण्यात आला. याप्रसंगी शेकडो ग्रामस्थांच्या उपस्थितीत सभेत सागर बेग हे बोलत होते.

यावेळी विश्वास पवार, अंकित ढेरे, नानासाहेब शहाणे, अनिल कावरे, शरद पवार, योगेश गाडे, संतोष गाडे, धनराज गाढे, चंद्रकांत गाढे, जगन्नाथ गोपाळे, रवींद्र मंडलिक, भाऊसाहेब कोहकडे, चांगदेव गाढे यांच्यासह ग्रामस्थ प्रयत्नशील होते.

> शिवाजी महाराजांचा खोटा इतिहास पसरवला जात आहे. महाराजांच्या सैन्यात कधीही मुस्लिम सैन्य नव्हते, परंतु मतांसाठी काही राजकीय पक्षांनी मुस्लिमांच्या दाढ्या कुरवाळल्या आहेत आणि जिहाद्यांचे तेव्हा केलेले लाड हिंदूंना आज त्रासदायक ठरत हिंदूंनाच विरोध करत आहेत. पक्ष कोणताही असो, विषय जेव्हा हिंदूंच्या अस्तित्वाचा येईल, तेव्हा हिंदूंनी एक होणे गरजेचे आहे.भविष्यात लवकरच याठिकाणी महाराजांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यासाठी प्रयत्न करणार असून ध्वजाला विरोध करणाऱ्यांवर आर्थिक बहिष्कार टाकावा.
>
> **– सागर बेग**

# पाथर्डी नगरपरिषदेची आरोग्यबाबत निष्क्रियता

## चिंचपूर रस्त्यावर वाहते गटारगंगा; नागरिकांचे आरोग्य धोक्यात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी शहरातील चिंचपूर रोडवरील मुख्य रस्त्यावर गटारीचे दूषित पाणी रस्त्यावर वाहत असल्याने स्थानिक नागरिक, व्यावसायिक आणि वाहनचालकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

चिंचपूर रोड हा पाथर्डीतील प्रमुख वाहतूक मार्ग असून, येथे सतत वाहनांची ये-जा सुरू असते. गटारीचे पाणी रस्त्यावर पसरल्याने वाहनचालकांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. पाण्यामुळे रस्ता निसरडा झाला असून, अपघाताचा धोका वाढला आहे. याशिवाय, पाण्यातून उडणारी दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे परिसरातील हवा प्रदूषित होत आहे, ज्याचा थेट परिणाम स्थानिकांच्या आरोग्यावर होत आहे.



नवीन नगरपरिषद इमारतीसमोरील गटार पूर्णपणे तुंबली असून, येथील घाण पाणी रस्त्यावर वाहत आहे. उपजिल्हा रुग्णालयाच्या मुख्य प्रवेश द्वारापासून ते मारुती मंदिरापर्यंत गटारीचे पाणी पसरले असून, या रस्त्यावरून जाणाऱ्या दुचाकी आणि चारचाकी वाहनांमुळे हे दूषित पाणी आजूबाजूच्या परिसरात उडत आहे. यामुळे परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधी पसरली असून, स्थानिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. या रस्त्यावर बुधवारी भरणाऱ्या आठवडी बाजारात शेतकरी, भाजीपाला आणि फळविक्रेते यांना या दूषित पाण्यासमोर बसून व्यवसाय करावा लागत आहे.

परिसरातील छोटी-मोठी दुकाने, बँक, शासकीय रुग्णालय आणि हॉटेल यांच्यासह वर्दळीच्या ठिकाणी गटारीच्या पाण्यामुळे ग्राहकांना आणि व्यावसायिकांना तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. गटारीचे पाणी रस्त्यावर वाहत असल्याने दुकानासमोर दुर्गंधी पसरली आहे. ग्राहक येण्यास कचरतात, याचा थेट परिणाम आमच्या व्यवसायावर होत आहे, अशी खंत स्थानिक दुकानदारांनी व्यक्त केली. स्थानिक नागरिकांनी याबाबत पाथर्डी नगरपरिषदेकडे अनेकदा तोंडी तक्रारी केल्या, परंतु प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. "आम्ही वारंवार तक्रारी करतो, पण नगरपरिषदेचे अधिकारी फक्त आश्वासने देतात. प्रत्यक्षात गटारी स्वच्छ करण्यासाठी कोणतीही हालचाल होत नाही," अशी तीव्र नाराजी स्थानिक रहिवाशांनी यांनी व्यक्त केली. विशेषतः रुग्णालया समोरील गटारीच्या पाण्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना अस्वच्छ परिसरातून वाट काढावी लागत आहे, ज्यामुळे रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

# जामखेड आगारातील ९ कर्मचारी सेवानिवृत्त

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड :** महाराष्ट्र राज्य परिवहन विभागातील जामखेड आगारातील तांत्रिक विभाग, वाहतूक विभाग चालक व वाहक पदावर कार्यरत तब्ब्ल नऊ जणांचा सेवापुर्ती गौरव सोहळा महावीर भवन येथे मोठया उत्साहात संपन्न झाला. यावेळी उपस्थितांनी कौतुक केले.

जामखेड येथील महावीर भवन येथे जामखेड आगारातील विविध विभागाचे नऊ कर्मचारी ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले. यानिमित्त त्यांचा निरोप समारंभ शनिवारी पार पडला. जामखेड आगारातील सेवानिवृत्त झालेले अनील सदाफुले, सुनिल वारे, भास्कर घुले, राजेंद्र जेधे, राजेंद्र माने, पांडूरंग म्हेत्रे, विश्वनाथ बहीर, दत्तात्रय बारस्कर, बाळासाहेब परकड यांना जामखेड आगारात आगारप्रमुख प्रमोद जगताप यांनी शाल श्रीफळ व फेटा बांधून सत्कार केला.

याप्रसंगी जामखेड आगर व्यवस्थापक प्रमुख प्रमोद जगताप, राम निकम, अर्चना राळेभात, अरुण जाधव, महादेव ढगे व अनेक मान्यवरांनी या नऊ जणांचा प्रशस्ती पत्र व गौरव चिन्ह देऊन सत्कार केला व सर्वांना पुढील सुखी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम निकम महाराज यांनी केले तर योगेश पोपळे,राजेंद्र पवार यांनी आभार मानले.

# गोहत्या न करण्याचा मुस्लिम बांधवांचा निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** तिसगाव तालुका पाथर्डी येथील सर्व मुस्लिम समाज बांधवांनी कुठल्याही प्रकारची गोहत्या न करण्याचा निर्णय घेतला असून राज्य सरकारने संविधानाप्रमाणे घालून दिलेल्या कायदा व सुव्यवस्थेचे पालन करण्यासाठी तसेच हिंदू, मुस्लिम समाजातील एकोपा कायम राहण्यासाठी हा सामूहिक निर्णय घेतला असल्याचे जामा मजीदचे प्रमुख मन्सूरभाई पठाण यांनी सांगितले आहे.



शुक्रवारी तिसगाव येथील जामा मस्जिदमध्ये दुपारी सामूहिक नमाज पठण झाल्यानंतर पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, मौलाना शहाबुद्दीन, मौलाना जाकीर बरकाती,मौलाना अल्ताफ, कय्युम इनामदार, रफिक शेख, यासीन शेख, हिदायत पठाण, हानीफ शेख, असलम शेख यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बकरी ईदच्या पूर्वसंध्येला मुस्लिम समाज बांधवांना पोलीस निरीक्षक मुटकुळे यांनी शुभेच्छा देत सर्व मुस्लिम समाज बांधवांनी कायद्याचे पालन करून कुठल्याही प्रकारे बकरी ईदच्या दिवशी गोहत्या करू नये, त्याचबरोबर सोशल मीडियावर देखील कुठल्याही प्रकारचे वादग्रस्त पोस्ट स्टेटस ठेवू नये जेणेकरून दोन समाजामध्ये तणाव निर्माण होणार नाही.

संविधानाणे दिलेल्या कायदे नियमाप्रमाणे सर्व मुस्लिम समाज बांधवांनी बकरी ईदचा सण उत्सव साजरा करावा असे आवाहन पोलीस निरीक्षक मुटकुळे यांनी यावेळी केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुस्लिम समाजाचे नेते मन्सूरभाई पठाण यांनी केले तर उपस्थितांचे आभार हनीफ शेख यांनी मानले.

# शेअर मार्केटच्या नावाखाली फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदे :** शेअर मार्केटमध्ये लाखाची गुंतवणूक करा आणि दरमहा १० हजार देण्याचे अवाजवी आमिष दाखवून दोन भामट्यानी लाखो रुपयांची फसवणूक केल्याची घटना श्रीगोंद्यात घडली असून याबाबत श्रीगोंदे पोलीस ठाण्यात दोघांच्या विरोधात लाखो रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यातील अमोल साहेबराव काळे या आरोपीला श्रीगोंदे पोलिसांनी पुण्यातून जेरबंद केले आहे, अशी माहिती पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

शिंदे म्हणाले कि, श्रीगोंद्यात सध्या मोठ्या प्रमाणात शेअर मार्केटचे थैमान सुरू झाले आहे. शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक करून




त्याचा परतावा देण्याची मोठी आमिषे दाखविली जातात. त्यामध्ये एक लाख रुपये गुंतवणूक केल्यावर दरमहा १० हजार रुपये देण्याचे अवाजवी आमिष दाखवून आढळगाव येथील अमोल साहेबराव काळे व किशोर हरिचंद्र नवले (रा. चांदा बु. ता. कर्जत) यांनी शेअर बाजारात गुंतवणूक करुन भरघोस परतावा मिळवून देण्याचे आमिष दाखवून श्रीगोंद्यात लाखो रुपयांची फसवणूक केल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे.

तालुक्यातील शेडगाव येथील संजय साहेबराव बेलेकर यांची फसवणूक केली. वारंवार मागणी करूनही पैसे मिळेनात म्हणून बेलेकर यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी यातील एका आरोपीला पुणे येथून अटक केली असून दुसरा आरोपी अद्याप फरार आहे.

# पाथर्डीतील गटारींची दुरुस्ती युद्धपातळीवर

## पालिकेचे मुख्याधिकारी लांडगे यांचे विशेष लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी नगरपालिकेने बंदिस्त गटारीच्या कामासाठी खणलेल्या रस्त्यांमुळे आणि सततच्या पावसामुळे शहर आणि उपनगरातील रस्त्यांची चाळण झाली होती. यामुळे आनंद नगर, नाथनगर, संत वामनभाऊ नगर, शिवशक्ती नगर,शेवगाव रोड व इतर शहरातील मोठ्या स्वरूपातील भागात नागरिकांना चिखलमय रस्त्यांवरून ये-जा करताना मोठी अडचण सहन करावी लागली.

### रस्त्यांची कामे लवकर करावी

नागरिकांनी आणि व्यावसायिकांनी गटारीचे व रस्त्यांचे काम लवकर पूर्ण करण्याची मागणी केली आहे. मुख्याधिकारी लांडगे यांनी शहरातील सर्व रस्त्यांची आणि गटारींच्या परिस्थितीचा आढावा घेऊन दुरुस्तीचे नियोजन केले आहे. पाणीपुरवठा आणि भूमिगत गटारीच्या कामासाठी खणलेले रस्ते सिमेंट काँक्रिटने बुजवण्याचे काम प्रगतीपथावर आहे, तर काही ठिकाणी चिखलाचा त्रास कमी करण्यासाठी दगडी मुरूम टाकण्यात येत आहे.



विशेषतः लहान मुले, महिला आणि शेवगाव रोडवरील व्यावसायिकांना याचा त्रास जाणवत आहे. मात्र, पावसाने उघडीप दिल्याने नगरपालिकेचे मुख्याधिकारी संतोष लांडगे यांनी रस्त्यांच्या बिकट अवस्थेची आणि शेवगाव रोडवरील मुख्य गटारीच्या दुरवस्थेची गांभीर्याने दखल घेऊन विशेष लक्ष केंद्रित केले आहे. खोदलेले रस्ते सिमेंट काँक्रिट आणि दगडी मुरूम टाकून टप्प्याटप्प्याने पूर्ववत करण्याचे व गटारींच्या दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

संत वामनभाऊ नगरात गटारीच्या कामासाठी रस्ते खणण्यात आले. ज्यामुळे मातीचे ढीग आणि चिखल यांमुळे रहिवाशांचे हाल झाले. अनेक रस्त्यांवर 'काम सुरू, प्रवेश बंद' असे फलक लावल्याने वाहतूक ठप्प झाली होती. त्याचप्रमाणे, शेवगाव-पाथर्डी मुख्य रस्त्यालगतच्या भूमिगत गटारीची दुरवस्था झाली आहे.

# तनपुरे गटाचे कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर तालुक्यातील डोंगरगण येथील सरपंच वैशाली मते, ग्रामपंचायत सदस्य आशाबाई कदम, भिमाबाई कोकाटे, अशोक चांदणे, सर्जे राव मते व पद्माताई काळे सर्जे राव मते हे आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये दाखल झाले. काही दिवसांपूर्वीच तनपुरे गटाचे प्राबल्य असलेल्या इमामपूर ग्रामपंचायतचे सरपंच व सदस्य आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये दाखल झाले होते.

त्यानंतर आमदार कर्डिले यांनी तेथील विकासाचा अनुशेष भरून काढत अवघ्या सहा महिन्यात अनेक विकास



कामे मार्गी लावली. त्यामुळे शेजारच्या डोंगरगण गावातही सरपंच सर्जेराव मते यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सदस्यांनी तसेच अनेक कार्यकर्त्यांनी माजी मंत्री आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्यावर विश्वास दाखवत भाजपमध्ये प्रवेश केला.

यावेळी जेष्ठ नेते बबनराव पठारे, डॅनियल शिरसाट, अशोक घोरपडे, जालिंदर आढाव, संजय आढाव, अशोक पाटील मते, संतोषजी खेत्री, रामदासजी भुतकर, राजेंद्र भुतकर, जगन्नाथ खेत्री, दत्तात्रय काळे, यशवंत चांदणे, सचिन कदम उपस्थित होते.

# गावात दारू बंदीची केली मागणी

## तरूणाला पोलिसांकडून जाच; केले उपोषण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** देवी भोयरे गावातील अवैध दारूबंदीची मागणी करणाऱ्या कार्यकर्त्यालाच पारनेर पोलीसांकडून जाच झाला असून दारू बंदी होण्यासाठी आमरण उपोषणालाला बसण्याची वेळ देवीभोयरे येथील ॲड . जितेश गायकवाड या सामाजिक कार्यकर्त्यावर आली असून याची दखल घेऊन जिल्हा पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी पारनेर पोलीसांना दारू बंद करण्याचे आदेश दिले आहे.

ॲड. गायकवाड या विषयी माहिती देताना म्हणाले की, या आधी दारू बंद होण्यासाठी पारनेरला उपोषण केल्यामुळे गावातील अवैध दारू बंद झाली होती. परंतु दारू बंद केल्याचा राग मनात धरून संबंधित दारू विक्रेते व पारनेर पोलीस स्टेशनचे कर्मचारी यांनी जाणीवपूर्वक माझ्यावर सूड उगवण्याची भावनेतून मला अडकविण्यासाठी अडचणी अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. त्यांनी माझ्या चुलत्याच्या घरावर दारूचे फुगे असणारी गोणी त्यांच्या माणसा मार्फत तेथे ठेवून मला खोट्या गुन्ह्यामध्ये अडकवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा प्रयत्न यशस्वी झाला.



गावातील दारू बंद करण्यासाठी वारंवार उपोषण करत असल्यामुळे मुंबई दारूबंदी अधिनियम कायदा कलम ६५ अंतर्गत माझ्यावर व माझ्या भावावर सुड भावनेतून कारवाई करण्यात आली. मला व माझ्या भावावर खोटे गुन्हे दाखल करून मला पारनेर पोलीस ठाण्यात डांबून ठेऊन मारहाण केली.

# पर्यावरण दिनानिमित्त सायकल रॅली

## जनतेला दिले वृक्षारोपणाचे महत्व पटवून

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पाथर्डी शहरात पर्यावरण संवर्धनासाठी सायकल रॅली आणि वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम राबवण्यात आला. पर्यावरणप्रेमी डॉ. दीपक देशमुख यांच्या पुढाकाराने दीपक देशमुख मित्र मंडळातर्फे आयोजित या उपक्रमात शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. यंदाच्या या रॅलीचे एकविसावे वर्ष होते.

### उपक्रमात यांनी घेतला सहभाग

या उपक्रमात पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, डॉ. दीपक देशमुख, राजेंद्र काळे, डॉ. विनय फड, श्रीकांत निऱ्हाळी, ॲड. हरिहर गर्जे, पांडुरंग बांगर, कोंडीराम बोरुडे, सुखदेव मर्दाने, अरविंद सोनटक्के, हुमायून आतार, ॲड. दिनकर पालवे, ज्ञानदेव लोखंडे, विजय पवार यांच्यासह अनेक नागरिक, विद्यार्थी आणि पर्यावरणप्रेमींनी सहभाग घेतला.पाथर्डीकरांनी या रॅलीच्या माध्यमातून स्वच्छ, हरित आणि प्रदूषणमुक्त शहराच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले.



गुरुवारी सायंकाळी शहरातील माणिकदौंडी रोडवरील संस्कार भवन येथून सायकल रॅलीला प्रारंभ झाला. नगर रोड, नाईक चौक, अजंठा चौक, क्रांती चौक, नवी पेठ, कोरडगाव चौक मार्गे ही रॅली फुलेनगर येथील भगवान उद्यानात पोहोचली. रॅलीच्या समारोपस्थळी वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्यात आला. यावेळी पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी आधुनिक जीवनशैलीमुळे वाढणाऱ्या प्रदूषणावर चिंता व्यक्त करत सायकल वापराचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, "सायकल वापरामुळे आरोग्य टिकते आणि पर्यावरण रक्षणास हातभार लागतो. भविष्यातील पिढ्यांसाठी हे पाऊल अत्यंत आवश्यक आहे.

# कोल्हार बुद्रक येथे ऊस उत्पादक शेतकरी मेळावा

## शिवराज्याभिषेक दिनाचे साधले औचित्य

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून कोल्हार बुद्रुक येथे छत्रपती शिवाजी महाराजांना वंदन करून ऊस उत्पादक शेतकरी मेळावा व खरीप पीक परिसंवादाची भव्य सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, कृषी विभाग व तसेच कृषक शेतकरी गट कोल्हार बु. यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. हा कार्यक्रम 'विकसित कृषी संकल्प अभियान' अंतर्गत दिनांक ६ जून रोजी सकाळी ९ वाजता ज्ञानेश्वर खर्डे पाटील (संचालक, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना प्रवरानगर) यांच्या वस्तीवर संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या शेवटी शेतकऱ्यांसाठी प्रश्नोत्तर सत्र आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शिवराज्याभिषेक दिनानिमित्त घेतलेले 'शिवप्रतिज्ञा संकल्प', ज्या अंतर्गत शेतकऱ्यांनी स्वराज्य संकल्पनेप्रमाणे प्रामाणिक, पर्यावरणपूरक आणि आधुनिक शेती करण्याचा निर्धार केला.

परिसरातील अनेक शेतकरी बांधवांनी उपस्थित राहून कार्यक्रमास भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर येथील शास्त्रज्ञांनी ऊस रोप लागवड पद्धत व फायदे, ऊस शेतीतील आधुनिक पद्धती, सुधारित वाण, ठिबक सिंचन, सेंद्रिय खतांचा वापर आणि पीक व्यवस्थान खत व्यवस्थापनाबाबत, ऊसावरील प्रमुख रोग व किडींचे नियंत्रण कसे करावे, यावर शास्त्रशुद्ध माहिती दिली. या कार्यक्रमात विविध आधुनिक शेती पद्धती,




सुधारित ऊस वाण, पाण्याचे व्यवस्थापन आणि खतांचे संतुलित वापर यावरील तज्ज्ञांचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना मिळाले. त्यांनी नैसर्गिक उपाय, फेरोमोन सापळे आणि कीटनाशकांची सुरक्षितता या बाबींवर भर दिला.

# पाथर्डी आगाराची झाली दुरवस्था

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या पाथर्डी आगारातील दुरवस्थेबाबत वेळोवेळी निवेदन देऊनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अरविंद दगडू सोनटक्के यांनी यासंदर्भात आगार व्यवस्थापक यांना पुन्हा एक निवेदन देत ११ जून रोजी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

सोनटक्के यांनी दिलेल्या निवेदनात पाथर्डी आगारात झालेल्या अ-सुविधांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे. यामध्ये जुन्या व तांत्रिकदृष्ट्या जीर्ण बसमुळे प्रवाशांचे हाल, स्वच्छतागृहाची सुविधा नसल्यामुळे महिलांची कुचंबणा व चोऱ्यांचे प्रमाण वाढल्यामुळे सीसीटीव्ही बसवण्याची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. नव्याने किमान २० बस पाथर्डीला द्याव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या आहे.

या मागण्या दहा दिवसांत मान्य न झाल्यास, दि. ११ जून रोजी सकाळी पाथर्डीच्या जुन्या किंवा नवीन बसस्थानकावर घंटानाद, बैठा सत्याग्रह, उपोषण वा जागरण गोंधळासारख्या तीव्र आंदोलनाचे आयोजन करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

# संपादकीय

## महायुध्दाच्या दिशेने...

युक्रेनने 'ऑपरेशन स्पायडर'अंतर्गत रशियाच्या एअरबेसवर हल्ला चढवत जणू कहर केला. युक्रेनने या भयंकर ड्रोन हल्ल्यात किमान ४० रशियन बॉम्बर्स नष्ट केले आहेत. तुर्कीतील इस्तंबूलमध्ये दोन्ही देशांदरम्यान बैठक होणार असताना युक्रेनने हा हल्ला केला. युक्रेनने टीयू ९५ आणि टीयू २२ बॉम्बर्ससह रशियाची ४० विमाने नष्ट केल्याचा दावा केला आहे. ही दोन्ही श्रेणीतील विमाने अण्वस्त्रे वाहून नेण्यास सक्षम होती. युक्रेनच्या सुरक्षा सेवेने म्हणजेच एसबीयूने या हल्ल्याची तयारी ११ महिन्यांपासून केली होती. मात्र कोणालाही त्याची कुणकुण लागली नाही हे विशेष. मुख्य म्हणजे बैठकीपूर्वी असा विनाशकारी हल्ला करुन त्यांनी वचक निर्माण केला आहे, असेही म्हणता येईल. आंतरराष्ट्रीय निरीक्षकांच्या मते, युक्रेनचे अध्यक्ष व्लादिमीर झेलेन्स्की चर्चेपूर्वीच रशियावर दबाव वाढवू इच्छित होते. कारण ही घटना घडतेवेळी क्रेमलिनचे सहाय्यक व्लादिमीर मेडिन्स्की यांच्या नेतृत्वाखालील रशियन शिष्टमंडळ तुर्कीला पोहोचले होते. या हल्ल्यानंतर परिस्थिती बदलणे स्वाभाविक होते. अशा हल्ल्यानंतर पुतिन गप्प बसणार नाहीत आणि त्यांचा बदला भयानक असू शकतो, हे सांगण्यासाठी कोणा ज्योतिषाची गरज नाही. त्यामुळेच युक्रेनचे अध्यक्ष झेलेन्स्की यांच्या इशाऱ्यानुसार केल्या गेलेल्या या हल्ल्याने शांततेचा मार्ग बाधित झाला. या हल्ल्यानंतर रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन अण्वस्त्रे वापरू शकतात का, हा प्रश्नही अनेकांच्या मनात आहे. एकंदरच सध्या जगभर जाणवणाऱ्या युद्धजन्य वातावरणामध्ये या ताज्या घटनेने ताण वाढवण्याचे काम केले आहे. याआधीच युरोपीय देशांनी मोठ्या युद्धाची तयारी सुरू केली असून आपल्या नागरिकांना आणीबाणीसाठी तयार राहण्याचा सल्ला दिला आहे. स्वीडन, फिनलंड आणि जर्मनीच्या सरकारांनी नागरिकांना अन्न, पाणी आणि औषधांचा साठा करण्याचा सल्ला दिला आहे. वाढत्या लष्करी तणावामुळे आणि भविष्यातील सुरक्षेबद्दलच्या चतेमुळे हा सल्ला देण्यात आला आहे. ब्रिटन अमेरिकेकडून एफ-३५ लढाऊ विमाने खरेदी करण्यासाठी चर्चा करत असताना दुसरीकडे नाटोचे सरचिटणीस मार्क रुट यांनी इशारा दिला आहे की, रशिया २०३० पर्यंत युरोपवर हल्ला करू शकतो. वॉर्सा भेटीदरम्यान त्यांनी हे वक्तव्य केले. इतकेच नव्हे तर, रशियाने पोलंड कवा इतर कोणत्याही मित्रराष्ट्रावर हल्ला केला तर या कृतीचा युरोपला पूर्ण ताकदीने सामना करावा लागेल, असे मतही त्यांनी मांडले. सुमी या युक्रेनियन शहरावर रशियन क्षेपणास्त्र पडल्यानंतर त्यांनी हे विधान केले होते. दुसरीकडे, युक्रेन हरला तर रशिया बाल्टिक देश, फिनलंड कवा पोलंडसारख्या शेजारील देशांमध्ये प्रवेश करण्याचा प्रयत्न करू शकतो आणि त्यामुळे नाटोला रशियाशी युद्ध करण्यास भाग पाडले जाईल, असा सिद्धांत काही संरक्षण तज्ज्ञ सतत मांडत आहेत. गेल्या महिन्यात दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीच्या ८० व्या वर्धापनदिनानिमित्त एक सर्वेक्षण करण्यात आले. त्यात दिसून आले की पुढील दहा वर्षांमध्ये आणखी एक विनाशकारी जागतिक युद्ध होऊ शकेल, असे अमेरिका आणि पश्चिम युरोपमधील अनेक लोकांचे म्हणणे वा मत आहे.

थोडक्यात, रशिया आणि युक्रेन, इस्त्रायल आणि हमास, भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढता राहिल्यास पुढील पाच ते दहा वर्षांमध्ये आणखी एका महायुद्धाची शक्यता खूप जास्त कवा बरीच जास्त आहे, यात शंका नाही. अमेरिकेतील ४५ टक्के लोकांनीही ही चता व्यक्त केली आहे. युरोपमध्ये युद्धाची शक्यता लक्षणीयरीत्या वाढली असताना मध्य पूर्वेतला हसाचारही पुन्हा सुरू झाला आहे. गाझामध्ये इस्रायली हल्ल्यांमुळे युद्धबंदी करार धोक्यात आला आहे. दक्षिण लेबनॉनमध्ये हिजबुल्लाहवर हल्ला होत आहे आणि सीरियामधील परिस्थिती अजूनही वाईट आहे. अमेरिकेने येमनमध्ये हुथी सैन्यावर हवाई हल्ले केले आहेत. इराण अण्वस्त्रे बनवण्याचा प्रयत्न करत असल्याचे वृत्त आहे. काही गुप्तचर संस्थांनुसार रशिया आणि इराणमध्ये लष्करी तंत्रज्ञानाची देवाणघेवाण होऊ शकते. आधी उल्लेख केल्याप्रमाणे पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान जवळजवळ युद्धात अडकले होते. हे दोन्हीही अणुबॉम्ब असणारे देश आहेत. शिवाय 'ऑपरेशन सदूर'ची धग संपणार नसल्याचे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. भारत आता दहशतवादाबाबत 'शून्य संवेदशीलतेचे' धोरण राबवत आहे. ही सगळी परिस्थिती जगाला युद्धाच्या शक्यतेच्या अधिकाधिक जवळ नेणारी आहे. आशियामध्ये तैवानवरून अमेरिका आणि चीन आमनेसामने आहेत. त्यामुळेच सगापूरचे पंतप्रधान लॉरेन्स वोंग यांनी वाढत्या दबावामुळे जग एका मोठ्या युद्धाच्या जवळ येऊ शकते, असे म्हणत दिलेला इशारा दुर्लक्ष करण्याजोगा नाही. दुसरे महायुद्ध जपानमधील दोन शहरांवर अणुबॉम्ब टाकून संपले. तोपर्यंत फक्त अमेरिकेकडे अणुबॉम्ब होते. परंतु आता दहा देशांकडे असे अणुबॉम्ब आहेत जे पृथ्वीचा खूप मोठा भाग कायमचा नष्ट करू शकतात. हे सगळे बघता जगभरातील सरकारे त्यांच्या संरक्षण धोरणांमध्ये बदल करत आहेत. युरोपीय देश अमेरिकेने बनवलेले पॅट्रियट क्षेपणास्त्र आणि इस्रायलचे 'ॲरो ३ इंटरसेप्टर' सारख्या हवाई संरक्षण प्रणाली तैनात करत आहेत. युरोपमध्ये स्वतंत्र अणुप्रतिबंधक यंत्रणा तयार करण्याबाबतही चर्चा सुरू आहे. पोलंडसारखे देश सामरिक अण्वस्त्रांमध्ये रस दाखवत आहेत. ही सर्व पावले खबरदारी म्हणून उचलली जात असल्याचे ज्या त्या देशातील राजकीय नेते सांगत आहेत. परंतु हे देश संरक्षणविषयक तयारी आणि नागरी सुरक्षेत वाढ करत असल्याचा वेग पाहिला तर त्यावरून चतेची पातळी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे स्पष्ट होते.

युक्रेनच्या ताज्या भयानक हल्ल्याला अमेरिकेचा पाठबा होता का, या प्रश्नाचे उत्तर अद्याप सापडलेले नाही. झेलेन्स्की यांनी अमेरिकेला अनेक वेळा युद्धात ओढण्याचा प्रयत्न केला आहे. युक्रेनने पोलंडवर बॉम्ब टाकल्याचा आरोपही करण्यात आला होता तसेच या प्रकरणी या देशाने रशियाला दोष दिल्याची बाबही समोर आली होती. म्हणजेच झेलेन्स्की कोणत्याही परिस्थितीत रशियाविरुद्धच्या लढाईला व्यापक लढाई बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. पुतिन यांच्या रागाचे काय परिणाम होतील हे सध्या सांगता येत नाही. परंतु रशिया अशा प्रकारे ४० लढाऊ विमानांचा नाश कधीही सहन करणार नाही. त्यामुळेच पुतिन अणुपर्यायाचा विचार करतील का, हा सर्वात धोकादायक प्रश्न आहे जो कधीला बाजूला ठेवता येणार नाही.

# डिजिटल ॲक्सेसला मूलभूत अधिकार




'डिजिटल इंडिया' मोहिमेने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहनावर, सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे. कसा घडतोय हा बदल? त्यासाठी सरकारी उपक्रम कोणती भूमिका बजावत आहेत?

तंत्रज्ञानाच्या प्रसारामुळे जगातील अब्जावधी लोकांच्या जीवनामध्ये फार वेगाने बदल घडताना आपण पाहतो आहोत. या सर्व प्रकारच्या तंत्रज्ञानांमध्ये माहिती आणि संवादाचे तंत्रज्ञान (इन्फर्मेशन अँड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी) सर्वात आघाडीवर आहे. यामुळे पूर्वी असलेले अंतराचे बंधन आता नाहीसे झाले असून आज सर्वांना सर्व प्रकारची माहिती मिळू शकते तसेच परस्परांशी गतिशील संवादही होऊ शकतो. अशा प्रकारे सर्व जग जोडले जाऊन 'ग्लोबल व्हिलेज' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे. आता इंटरनेटचे जाळे अनेक पटींनी पसरेल आणि ग्रामीण, गरीब आणि दुर्गम भागांमध्ये राहणाऱ्या कोट्यवधी नागरिकांना त्याचा फायदा होईल. हवा, पाणी, निवारा याप्रमाणेच ही एक अत्यावश्यक गरज आहे. जगभरातील लोक शिक्षण, आरोग्यसेवा, काम आणि निवास यासारख्या सामाजिक-आर्थिक मानवी हक्कांचा वापर करण्यासाठी इंटरनेटवर इतके अवलंबून आहेत की ऑनलाइन प्रवेश हा आता मूलभूत मानवी हक्क मानला पाहिजे. विकसनशील देशांमध्ये, इंटरनेटचा वापर (डिजिटल डिव्हाइड) हा एक मूलभूत फरक असू शकतो. आपल्या देशात हे शक्य आहे का, याबाबत अनेक मते असू शकतात, सरकारी साधनसामुग्री आरोग्य, पाणी, पायाभूत सुविधा (रस्ते) यावर जास्त भर दिला जावा असा अनेकांचा दृष्टिकोन असू शकतो. इंटरनेट, डिजिटल ॲक्सेस या सर्व चैनीच्या गोष्टी आहेत, असे अनेकांचे मत आहे. इथेच दृष्टिकोन बदलायची गरज आहे.

**तंत्रवेध**

**– डॉ. दीपक शिकारपूर**

सर्वोच्च न्यायालयाने एका महत्त्वपूर्ण निर्णयात म्हटले आहे की, डिजिटल प्रवेश हा कलम २१ अंतर्गत जीवन आणि स्वातंत्र्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार आहे. सरकारला डिजिटल विभाजन कमी करून सर्वांना समान डिजिटल ॲक्सेस सुनिश्चित करावा लागेल; जेणेकरून शिक्षण, आरोग्य, शासकीय सेवा आणि आर्थिक संधींमध्ये कोणालाही मागे रहावे लागणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले की ग्रामीण लोकसंख्येच्या मोठ्या भागांमध्ये, ज्येष्ठ नागरिकांमध्ये, आर्थिकदृष्ट्या दुर्बलांमध्ये, भाषिक अल्पसंख्याकांमध्ये आणि दिव्यांगांमध्ये डिजिटल विभाजन अस्तित्वात आहे. न्यायालयाने विशेषतः बँक आणि इतर सेवांसाठी असलेल्या 'नो युवर कस्टमर' प्रक्रियेत सुधारणा करण्याचे निर्देश दिले आहेत; जेणेकरून दृष्टीबाधित आणि शारीरिकदृष्ट्या अक्षम व्यक्तींनादेखील डिजिटल सेवांचा सहज लाभ घेता येईल. यासाठी ब्रेल आणि आवाज-आधारित पर्यायांचा विचार करण्याचे न्यायालयाने सांगितले आहे. फार पूर्वीपासून माणसाच्या रोटी-कपडा-मकान या मूलभूत गरजा मानल्या गेल्या आहेत. बदलत्या काळानुसार यामध्ये भर घालून बिजली-बँडविड्थ या दोन बाबींचाही समावेश केला गेला पाहिजे. इ-शासनासारख्या संकल्पना निव्वळ प्रसिद्धीपुरत्या मर्यादित न ठेवता खरोखरीच सर्व नागरिकांपर्यंत पोहोचवायच्या असतील तर हे करणे अनिवार्य आहे. युरोपमधील फिनलंड ह्या देशाने हे प्रत्यक्ष करूनही दाखवले आहे. ब्रॉडबँड इंटरनेट ॲक्सेस हा तेथील नागरिकांचा मूलभूत हक्क मानणारा कायदा २०१० मध्येच संमत झाला आहे. जगातले असे हे पहिलेच उदाहरण आहे.

फिनलंडच्या कायद्यानुसार, प्रत्येक नागरिकाला किमान एक (मेगाबाईट प्रति सेकंद) गतीचे ब्रॉडबँड कनेक्शन मिळवण्याचा हक्क आहे. तसेच २०१५ पर्यंत ही गती १०० मेगाबाईटपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. फिनलंडने हे पाऊल उचलण्यामागे हेतू हा होता की इंटरनेट आता केवळ मनोरंजनाचे साधन राहिलेले नाही, तर दैनंदिन जीवनाचा आवश्यक भाग बनले आहे. शिक्षण, सरकारी सेवा, बँकिंग आणि इतर अनेक महत्त्वाच्या कामांसाठी इंटरनेटची गरज असते. त्यामुळे, डिजिटल विभाजन कमी करणे आणि सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून देणे हे फिनलंडचे उद्दिष्ट होते. विशेषतः ग्रामीण भागात सर्वांना इंटरनेट ॲक्सेस मिळावे यासाठी काही मुद्द्यांकडे लक्ष देणे महत्वाचे आहे. 'भारतनेट'सारख्या प्रकल्पांद्वारे गावागावांमध्ये ऑप्टिकल फायबर केबल टाकली गेल्यास उच्च-गती इंटरनेट कनेक्टिव्हिटी मिळू शकेल. दुर्गम भागांमध्ये फोरजी आणि फाईव्हजी नेटवर्कसाठी मोबाइल टॉवर्स उभारण्याच्या योजनेमुळे डिजिटल भारत निधीसारख्या योजना मदत करू शकतात. फायबर किंवा टॉवर पोहोचवणे कठीण असणाऱ्या ठिकाणी उपग्रहाद्वारे इंटरनेट सेवा पुरवण्याची योजना आखायला हवी. याखेरीज गावांमध्ये सार्वजनिक ठिकाणी वाय-फाय हॉटस्पॉट योजना तयार करून लोकांना स्वस्त दरात इंटरनेट वापरता येईल. टेलिकॉम कंपन्यांना ग्रामीण भागासाठी परवडणाऱ्या डेटा योजना आणण्यासाठी प्रोत्साहित करणे यापुढील काळात महत्वाचे असेल. सध्या या कंपन्यांचा ग्राहक हा श्रीमंत शहरी असल्याने संतुलन साधण्यासाठी इंटरनेट सेवा पुरवणाऱ्या कंपन्यांना ग्रामीण भागात सेवा देण्यासाठी आर्थिक मदत करणे आवश्यक आहे.

काही ठिकाणी ग्रामपंचायती किंवा काही समुदाय एकत्रितपणे स्वतःचे इंटरनेट नेटवर्क तयार करू शकतात. तसेच ग्रामीण भागातील लोकांना इंटरनेट आणि डिजिटल सेवांचा वापर कसा करायचा हे शिकवण्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात. इंटरनेट आणि संबंधित सेवांची माहिती स्थानिक भाषांमध्ये उपलब्ध करणे या दृष्टीने महत्वाचे ठरते; जेणेकरून लोकांना ते सहज समजेल. ग्रामीण भागातील वीजेची समस्या लक्षात घेता कमी ऊर्जा वापरणाऱ्या उपकरणांचा वापर, इंटरनेट पायाभूत सुविधांसाठी सौर ऊर्जा किंवा इतर नूतनीकरणक्षम ऊर्जा स्रोतांचा वापर करणेही लक्षात घ्यायला हवे. ग्रामीण भागात टॉवर उभारण्यासाठी आणि फायबर केबल्स टाकण्यासाठी लागणाऱ्या परवानग्यांची प्रक्रिया जलद आणि सुलभ करण्यालाही महत्व द्यायला हवे. त्यासाठी खासगी कंपन्यांना ग्रामीण भागात इंटरनेट सुविधांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी आकर्षक योजना आखण्याची आणि प्रोत्साहन देण्याची गरज आहे. डिजिटल इंडिया मोहीम ही भारत सरकारद्वारे सुरू करण्यात आलेली एक महत्त्वाकांक्षी योजना आहे. नागरिकांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सरकारी सेवा उपलब्ध करून देणे, देशात डिजिटल पायाभूत सुविधा विकसित करणे आणि इंटरनेट कनेक्टिव्हिटी वाढवणे हा या योजनेमागील उद्देश आहे. यासोबतच, देशातील नागरिकांना डिजिटल साक्षर करणे आणि तंत्रज्ञानाचा वापर करून सक्षम करणे हेदेखील या मोहिमेचे उद्दिष्ट आहे. २०२५ पर्यंत डिजिटल इंडिया मोहिमेने अनेक महत्त्वपूर्ण नियोजनांमध्ये यश मिळवले आहे.

डिजिटल इंडिया मोहिमेचे सर्वात मोठे यश म्हणजे डिजिटल पेमेंटमध्ये झालेली वाढ. युनिफाइड पेमेंट्स इंटरफेस अर्थात युपीआयद्वारे होणारे व्यवहार डिसेंबर २०२४ मध्ये २३,२४,६९९.९१ कोटींवर पोहोचले आहेत, जे डिसेंबर २०१६ मध्ये केवळ ७०७.९३ कोटी होते. आता , सिंगापूर, भूतान, नेपाळ, श्रीलंका, फ्रान्स आणि मॉरिशससारख्या सात देशांमध्ये युपीआय लाईव्ह व्यवहार सुलभ करत आहे. मार्च २०२३ पर्यंत १३६.६५ कोटींहून अधिक आधार कार्ड जारी करण्यात आली आहेत. जानेवारी २०२५ मध्ये आधार फेस ऑथेंटिकेशनने शंभर कोटींचा टप्पा ओलांडला. १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत डिजिलॉकर वापरकर्त्यांची संख्या ४६.५२ कोटींवर पोहोचली आहे. जानेवारी २०२५ पर्यंत २.१४ लाख ग्रामपंचायती इंटरनेटद्वारे जोडल्या गेल्या असून ६.९२ लाख किलोमीटर ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यात आली आहे. दरम्यान, ग्रामपंचायतींमध्ये १.०४ लाख वाय-फाय हॉटस्पॉट स्थापित करण्यात आले आहेत. 'जेम' अर्थात गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेसची वाढ: जानेवारी २०२५ पर्यंत 'जेम'ने चालू आर्थिक वर्षातल्या दहा महिन्यांमध्ये ४.०९ लाख कोटींचे सकल व्यापारी मूल्य गाठले आहे, जे मागील वर्षाच्या याच कालावधीच्या तुलनेत जवळपास ५० टक्क्यांनी अधिक आहे. याशिवाय 'उमंग' ॲपने ७.१ कोटींहून अधिक वापरकर्त्यांना ३२ राज्यांमधील २०७७ सरकारी सेवांशी जोडले असून २३ भाषांमध्ये समर्थन पुरवले आहे. 'दिक्षा' हे जगातील सर्वात मोठे शिक्षण तंत्रज्ञान प्लॅटफॉर्म ठरले आहे. त्यावर ५.५६ अब्जांहून अधिक शिक्षण सत्रे नोंदली गेली आहेत. शिवाय 'आयुष्मान भारत डिजिटल मिशन' अंतर्गत ६.७ कोटी आरोग्य खाते क्रमांक जारी करण्यात आले आहेत.

डिजिटल इंडियाने पायाभूत सुविधांच्या विकासावर, डिजिटल पेमेंटला प्रोत्साहन देण्यावर, सरकारी सेवा ऑनलाइन उपलब्ध करण्यावर आणि नागरिकांचे डिजिटल सक्षमीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. यामुळे शहरी आणि ग्रामीण भागातील डिजिटल दरी कमी होण्यास मदत झाली असून नागरिकांच्या जीवनात सुधारणा झाली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या हस्ते डॉ. कदमांना पुरस्कार

## राहुरी कृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांकडून कदमांवर अभिनंदनाचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख व काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाचे प्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांना उत्कृष्ट कृषि संशोधक २०२५ या पुरस्काराने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार त्यांना वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी व महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने राज्याच्या चारही विद्यापीठाच्या ५३ व्या संयुक्त कृषि संशोधन आणि विकास समितीच्या उद्घाटन कार्यक्रमात देण्यात आला.

याप्रसंगी कृषि विद्यापीठांचे प्रतिकूलपती ॲड. माणिकराव कोकाटे, पालकमंत्री मेघना बोर्डीकर, राज्यमंत्री आशिष जैस्वाल, खा. संजय जाधव, आ. डॉ. राहुल पाटील, आ. डॉ. रत्नाकर गुट्टे, आ. सतीश चव्हाण, आ. राजेश विटेकर, सचिव विकास रस्तोगी, कुलगुरू डॉ. शरद गडाख, कुलगुरू डॉ. इंद्रामणी, कुलगुरू डॉ. संजय भावे, परिमल सिंह, पुणेचे महासंचालक रावसाहेब भागडे उपस्थित होते.

डॉ. सुनील कदम हे महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख तसेच काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स प्रकल्पाचे प्रमुख संशोधक म्हणून काम पाहत आहेत.





### दिग्गज मान्यवरांकडून कदम यांचे कौतुक

डॉ. सुनील कदम यांना उत्कृष्ट कृषि संशोधक पुरस्कार मिळाल्याबद्दल कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे व अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

# महावितरणची विद्युत सुरक्षा जनजागृती रॅली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : कोपरगाव शहरात महावितरण कंपनीच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्ताने शहरातून विद्युत सुरक्षा रॅलीची सुरुवात पावर हाऊस महावितरण कार्यालय पासून निघून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गाने पुढे बस स्थानकात जाऊन तेथील प्रवाशांना विद्युत सुरक्षेबाबत जनजागृती संदर्भात नागरिकांमध्ये विद्युत अपघात शून्यावर आणण्याबाबत जाणीव निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आले.



यावेळी पावर हाऊस महावितरण कार्यालयात जाऊन तेथे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना सुरक्षा प्रतिज्ञा देण्यात आली. याप्रसंगी अतिरिक्त कार्यकारी अभियंता धनंजय हंडे, सहाय्यक अभियंता अतुल खंडारे, दिनेश पंडोरे, पंकज मेहता, संतोष धारराव यांच्यासह शहर व ग्रामीण उपविभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी याप्रसंगी या रॅलीमध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही रॅली शहरातून जात असताना या रॅलीचे कोपरगावकरांनी या अनोख्या उपक्रमाचे कौतुक करून अशा माध्यमातून विद्युत सुरक्षा बाबत समाजात जनजागृती व जाणीव निर्माण होणे खऱ्या अर्थाने गरजेचे असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले.

### पत्रके व रॅली काढून जनजागृती

विजेच्या खांबांना किंवा ताणांना जनावरे बांधू नये. तसेच बांधकाम करतांना विद्युत वाहक तारांजवळ काम करणे धोक्याची आहे. ऊर्जा वाचवा, ग्लोबल वार्मिंगची पातळी कमी करा, मीटर बोर्डापासून मटेरीपर्यंत जाणाऱ्या केबलला जॉईंट देऊ नका, घर अथवा दुकानांसाठी अथवा शेती पंप मोटार स्टार्टर साठी अर्थिंगची व्यवस्था करा, ट्रक मालगाडी यासारख्या वाहनांच्या टपावर बसून प्रवास करू नका, अशा आशयाचे पत्रके व रॅली काढून जनजागृती करण्यात आली.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

### ... पंतप्रधान मोदींनी फडकाविला तिरंगा झेंडा

सिंदूरचा विचार केला तर त्याला त्याचा पराभव आठवेल. पाकिस्तानने कधीही विचार केला नव्हता की भारत त्यांच्या देशात जाऊन दहशतवादी तळांवर हल्ला करेल. दहशतवादाच्या इमारती उजाड झाल्या आहेत. पाकिस्तान संतापला आहे. जम्मू आणि पूंछसह अनेक भागात घरे, मंदिरे आणि गुरुद्वारांवर गोळीबार करून त्यांनी आपला राग व्यक्त केला आहे. तुम्ही ज्या पद्धतीने लढलात ते देशातील प्रत्येक नागरिकाने पाहिले. देशवासी तुमच्यासोबत पूर्ण ताकदीने उभे आहेत. पंतप्रधान म्हणाले, दुर्दैवाने आपला शेजारी मानवतेच्या विरोधात आहे, सौहार्दाच्या विरोधात आहे. हा असा देश आहे जो गरिबांच्या उपजीविकेच्या विरोधात आहे. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये जे घडले ते याचेच उदाहरण आहे. पाकिस्तानने मानवता आणि काश्मिरीयतवर हल्ला केला. त्याचा हेतू काश्मीरमधील कष्टकरी लोकांची कमाई थांबवण्याचा होता, म्हणून त्याने पर्यटकांवर हल्ला केला. सतत वाढत असलेले पर्यटन, येथे येणाऱ्या पर्यटकांची विक्रमी संख्या, जे जम्मू-काश्मीरच्या लोकांसाठी उपजीविकेचे साधन आहे, पाकिस्तानने त्यांना लक्ष्य केले. हे सर्व नष्ट करण्याचा पाकिस्तानचा कट होता.

### शिवरायांच्या जयघोषाने गड दुमदुमला

मदत केंद्रं, कडेकोट सुरक्षा आणि तंत्रज्ञानाचा वापर यांसह आदी गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी प्रशासनाने भक्कम व्यवस्था केली होती. गडावरील हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी रायगड ते पाचाड परिसरात १०९ सीसीटीव्ही कॅमेरे, १७ ठिकाणी पब्लिक अलाऊंस सिस्टीम, आणि ९ एलईडी स्क्रीनवर थेट प्रक्षेपण सुरू आहे. शिवभक्तांच्या मार्गदर्शनासाठी दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत. एसटी महामंडळाच्या १०० बसगाड्या पाचाड व पार्किंगच्या ठिकाणी सुरू करण्यात आल्या आहेत. १२ ठिकाणी पार्किंगची सोय देखील करण्यात आली आहे. माजी खासदार संभाजीराजे छत्रपती यांच्या उपस्थितीमध्ये शिवराज्याभिषेक दिनाच्या पूर्वसंध्येला दुर्गराज रायगडावर विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले होते.

### 'कृषी'च्या बियाण्याचा लाभ घ्यावा : आ. काळे

कार्यकारी सेवा सोसायटी मंजूर या ठिकाणी मोफत बियाणे उपलब्ध आहे. या कृषी सेवा केंद्रातून शेतकऱ्यांनी आपली बियाणे कृषी विभागाच्या आवश्यक कागदपत्रांची पुर्तताकरून आपले नोंदविलेले बियाणे घ्यावीत. तसेच राज्य शासनाच्या वतीने कृषी गटासाठी पीक प्रात्यक्षिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

### आ. किरण लहामटेंच्या उपस्थितीत गुणगौरव सोहळा

मोबाईलच्या वापरापासून दूर राहत आपले ध्येय गाठण्यासाठी संघर्ष करण्याचे आवाहन करत शिक्षकांनीही गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने प्रयत्नशिल राहण्याचे आवाहन डॉ. किरण लहामटे यांनी यावेळी केले. यावेळी प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी गुणवत्ता वाढीसाठी प्रकल्पामार्फत सातत्याने प्रयत्न करण्यात येत असल्याचे सांगितले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणही करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहायक प्रकल्प अधिकारी दीपक कालेकर यांनी केले तर आभार शिक्षण विस्तार अधिकारी अंबादास बागुल यांनी मानले. कार्यक्रमास सहायक प्रकल्प अधिकारी मनोज पैठणकर, कार्यालयीन अधीक्षक श्याम कांबळे, सुनिल मोरे, मुख्याध्यापिका संगीता कुलथे, नामदेव पिचड आदी उपस्थित होते.

### एसपींचा आदेश अन् कत्तलखाने उद्ध्वस्त

पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांनी दिला आहे. त्याचाच एक भाग म्हणून तिसगाव येथील अनधिकृत कत्तलखाने जमीनदोस्त करण्यात आले आहेत. ही संपूर्ण कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपअधीक्षक प्रशांत खैरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.

### पंधरा बस मिळण्यासाठी प्रयत्नशील : आ. लंघे

साधन आहे. नेवासा मतदारसंघात अनेक प्रलंबित कामे पूर्ण करायचे आहेत. त्यासाठी सर्वांनी आवश्यक त्या सूचना कराव्यात. नेवासा तालुक्यासाठी पाच हजार घरकुले मंजुरीचे काम पूर्ण झाले आहे. तसेच पुढील घरकुलांसाठी जे कोणी राहिले असेल त्यांनी अर्ज करावे. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती पंचगंगा उद्योग समूहाचे प्रभाकर शिंदे, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बाळासाहेब पवार, भाजप युवा नेते ऋषिकेश शेटे, अंकुश काळे, ज्ञानेश्वर पेचे, राजेंद्र मते, प्रताप चिंधे, मनोज पारखे, निरंजन डहाळे, भाऊसाहेब वाघ, आदिनाथ पटारे, डॉ. करण सिंग घुले, अशोक करडक आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. वासुदेव आव्हाड यांनी सूत्रसंचालन केले तर उपस्थितांचे आभारही मानले. गेल्या काही महिन्यांपासून नेवासा आगारात जुन्या व मोडकळीस आलेल्या गाड्यांमुळे अनेक मार्गांवर सेवा विस्कळीत झाली होती. त्यामुळे नव्या गाड्यांचे आगमन हा प्रवाशांसाठी मोठा दिलासा ठरणार आहे. या अगोदर इतर आगारांनाही नव्या गाड्या देण्यात आल्या होत्या. आता नेवासालाही बस मिळाल्याने प्रवासी वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. स्थानिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, बस वेळेवर व नीट चालवल्या गेल्यास खरोखरच फायदा होईल, अशी प्रतिक्रिया काही प्रवाशांनी दिली. पाच नवीन गाड्यांचे लोकार्पण झाल्यानंतर नेवासा पंढरपूर बोर्ड लावलेली अनेक दिवसांपासून भाविकांची मागणी असलेली बस स्वतः आ. लंघे यांनी सुमारे वीस फूट चालवून तिचे उद्घाटन केले. यावेळी बसमध्ये पंचगंगाचे प्रभाकरराव शिंदे यांच्यासह सर्वच सेना भाजपचे कार्यकर्ते बसमध्ये बसलेले होते. आमदारांच्या यशस्वी राईडनंतर उपस्थितांनी टाळ्या वाजवल्या होत्या.

देण्याच्या हायकोर्टाच्या आदेशांना सुप्रीम कोर्टात आव्हान दिले आहे. त्यामुळे सध्या सर्वांचे डोळे सुप्रीम कोर्टाच्या आदेशाकडे लागले आहेत. विशाळगड बकरी ईद कुर्बानी प्रकरणात कोर्टाने तातडीने सुनावणी घेऊन हायकोर्टाच्या आदेशाला स्थगिती द्यावी अशी मागणी कोल्हापूर प्रशासनाने केली आहे. यासाठी विशाळगडावर उत्पन्न होणाऱ्या संभाव्य कायदा सुव्यवस्थेचाही दाखला दिला आहे. पण सुप्रीम कोर्टाने या प्रकरणी तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला आहे. कोणताही धर्म किंवा श्रद्धा असो, संरक्षित स्मारकात काहीतरी गतिवीधी सुरूच असतात. त्या ठीक आहेत, असे मत कोर्टाने या प्रकरणी नोंदवले आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11


# बिबट्याचा पाळीव प्राण्यांवर हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** उंबरी बाळापूर (ता. संगमनेर) येथील मेढपाळ संदीप खंडू होडगर यांच्या मेढीच्या गोठ्या मध्ये शुक्रवार (दि ५ जुन) पहाटे ३ च्या सुमारास बिबट्या ने हाल्ला करत २ कोकरे मृत झाले असुन ५ कोकरे जबर जखमी तर १७ मेंढया किरकोळ जखमी झाल्या.

शेतकरी संदीप खंडू होडगर यांनी गाय शेळ्या प्रमाणेच जवळपास ३५ मेंढ्या बँकेचे कर्ज काढून विकत घेतल्या. २० बाय २० च्या ओपन शेड तसेच जवळच असलेल्या पोल्टी फॉम मध्ये काही मेंढ्या होत्या. तसेच १०० हून अधिक कोंबडया होत्या.

यामध्ये जवळपास ३० ते ३५ कोंबड्या ही बिबट्याच्या



हाल्यात मृत झाल्या. घटनास्थाळी वन विभागाकडून पंचनामा करण्यासाठी वनपाल रमेश पवार, वनरक्षक सालु सोनवणे, वन कर्मचारी बाळासाहेब डेंगळे तर सरकारी पशु वैदयकीय अधिकारी डॉ अविनाश नागरगोजे यांनी भेट दिली. बिबट्याच्या हल्यात सुमारे आडीच ते तीन लाख रुपायाचे नुकसान झाले असुन मृत मेंढ्या प्रमाणे कोंबड्या चे ही पंचनामे करणे आवश्यक आहे. घटनेत जवळपास ३० ते ३५ कोंबड्या मृत झाल्या असुन मेंढ्या प्रमाणे कोंबड्या च्या ही नुकसान भरपाई शासनाने करावी अशी मागणी शेतकरी संदीप होडगर यांनी केली आहे.

---

बिबट्याच्या हाल्यात २ कोकरे मृत झाले असुन ५ कोकरे हे जबर जखमी तर १७ मेंढया ह्या किरकोळ जखमी झाल्या. मृत झालेल्या मेंढ्याचे पंचनामे केले असुन पुढील कारवाई साठी वरिष्ठ अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे. त्यांच्या आदेशा नुसार पुढील कारवाई केली जाईल.

**-रमेश पवार,**
**वनपाल शाखा २ संगमनेर.**

# राष्ट्रवादी पक्ष एक नंबरचा करण्यासाठी काम करावे

## आमदार संग्राम जगताप; वर्धापन दिनानिमित्त नियोजनाची बैठक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा एक नंबरचा करण्यासाठी काम करावे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन १० जून रोजी पुणे बालेवाडी येथे होणार असून त्या कार्यक्रमाच्या नियोजनाच्या बैठकीत आमदार संग्राम जगताप बोलत होते यावेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, राजेंद्र नागवडे, घनश्याम शेलार, प्रा. माणिकराव विधाते, प्रशांत गायकवाड, अभिजीत खोसे, संतोष धुमाळ, सुमित कुलकर्णी, अशोक चोभे, बाळासाहेब शिंदे, विजय देशपांडे, संजय कोळगे, सचिन डेरे, संध्या सोनवणे, महिला शहर जिल्हाध्यक्ष आशाताई निंबाळकर, सुषमा रावडे आदी उपस्थित होते.

आमदार काशिनाथ दाते म्हणाले की, पुणे येथे १० तारखेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. तरी नगर जिल्ह्यातून सर्वात जास्त कार्यकर्ते सभेला जाणार आहे. आपल्या जिल्ह्यामध्ये विधानसभेचे ४ आमदार असून एक विधान परिषदेचे आम दार आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ताकद मोठी आहे. येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये आपल्या पक्षाची ताकद दाखवी लागेल. वेळ पडल्यास स्वतंत्रपणे निवडणुका लढण्याचा निर्णय झाल्यास आपली स्वतंत्र तयारी असणे गरजेचे आहे. तरी कार्यकर्त्यांनी जनतेमध्ये राहून पक्षाचे काम करावे.

आ. जगताप म्हणाले, जिल्ह्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राजकीय ताकद मोठी आहे. कार्यकर्त्यांनी जनतेचे प्रश्न हाती घेऊन ते सोडविण्याचे काम करावे त्या माध्यमातून नागरिकांचा विश्वास संपादन केला जातो. पक्षाचे संघटन मजबूत असल्यावरती खऱ्या अर्थाने नागरिकांचे काम मार्गी लागत असतात. कार्यकर्त्यांनी पक्षाच्या आदेशाची वाट न पाहता आपला विकासाचा अजेंडा तयार करून गाव पातळीवर, वार्डात काम करावे, आम्ही आमचा अजेंडा तयार करून काम करतो. निवडणुकीमध्ये विजय मिळवण्यासाठी सातत्याने काम करत राहणे गरजेचे आहे.

आमदार गोपीचंद पडळकर व लक्ष्मण हाके या दोन व्यक्ती राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर सातत्याने बिनबुडाचे आरोप करत टीका करत असतात आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने त्यांच्या निषेधाचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला आहे, वेळ पडल्यास नगर जिल्ह्यामध्ये या दोघांना त्यांची जागा दाखवली जाईल, असा इशारा बाळासाहेब शिंदे यांनी दिला.

# तुकाईमाता डोंगरात ५ हजार बिजांचे रोपण

## बाबुजी आव्हाड महाविद्यालयाचा उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून येथील बाबुजी आव्हाड महाविद्यालयाने हंडाळवाडी शिवारातील तुकाईमाता डोंगर परिसरात विविध प्रजातींच्या वनस्पतींचे बिजरोपण करून पर्यावरण संवर्धनाचा अनोखा उपक्रम राबवला. या मोहिमेत लिंब, करंज, सीताफळ, चिंच, बोर आदी वनस्पतींच्या सुमारे पाच हजारांहून अधिक बिजांचे रोपण करण्यात आले.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बबन चौरे म्हणाले, पर्यावरणाचे संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. सध्या वृक्षतोड, प्रदूषण आणि औषधी वनस्पतींचा ऱ्हास यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत आहे. पावसाचे प्रमाण कमी होत असून, दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. वन्यजीवांचे प्रमाणही घटत आहे. मानवी आरोग्य आणि सामाजिक स्वास्थ्य टिकवण्यासाठी पर्यावरण संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याची काळजी घेण्याचा संकल्प करावा.या बिजरोपण मोहिमेत राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) चे कॅडेट्स, राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) चे स्वयंसेवक, विद्यार्थी आणि प्राध्यापक यांनी उत्साहाने सहभाग घेतला. कार्यक्रमाचे संयोजन एनएसएस विभागप्रमुख डॉ. अरुण राख, प्रा. आनंद घोंगडे, एनसीसी विभागप्रमुख कॅप्टन डॉ. अजयकुमार पालवे आणि ग्रंथपाल डॉ. किरण गुलदगड यांनी केले.हा उपक्रम पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला असून, स्थानिक स्तरावर पर्यावरण संवर्धनासाठी एक प्रेरणादायी पाऊल मानले जात आहे.

# महावितरणची ग्राहक लकी ड्रॉ सोडत

## शेळके, पाठक, काकडे बक्षिसाचे मानकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी :** महावितरणच्या डिजिटल लक्की ड्रॉमध्ये मे महिन्यातील प्रथम क्रमांक विजेते सोपान मोहन शेळके रा. माळीबाळगाव, सुभाष चिमाजी पाठक, राहणार मिरी द्वितीय व महेश शंकर काकडे राहणार पाथर्डी तृतीय यांना अँड्रॉइड मोबाईलचे वाटप करण्यात आले. तर सुधीर रावसाहेब दराडे रा. पांगोरी पिंपळगाव यांना स्मार्टवॉच बक्षीस देवुन सन्मानित करण्यात आले.

महावितरणच्या डिजिटल ग्राहक लकी ड्रॉ अंतर्गत महावितरणचे वीज बील नियमितपणे ऑनलाइन भरणा करण्यासाठी व ग्राहकाना



प्रेरित करण्यासाठी ऑनलाईन वीज बील भरणा करणाऱ्या ग्राहकांपैकी लक्कीड्रॉचे आयोजन पाथर्डी तालुका महावितरणकडून करण्यात आले. या उपक्रमाला तालुक्यातील वीज ग्राहकांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक काढून ग्राहकांना अँड्रॉइड मोबाईल व अत्याधुनिक चे स्मार्ट वाच गिफ्ट स्वरूपात महावितरणकडून दिले जाते. तसेच वेळेत व नियमित ऑनलाइन वीज बील भरणाऱ्या प्रत्येक ग्राहकाला वीज बिलात सवलत दिली जाते. छापील बील न वापरता इ- बील नोंदणी करणाऱ्या ग्राहकांनाही प्रत्येक बिलात १० रुपये एवढी सवलत दिली जाते.

# शिवरायांच्या प्रशासन कार्याचा आदर्श घेऊन काम करावे : डांगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराज यांची प्रशासन व्यवस्था आणि कार्यपद्धती अतिशय प्रभावशाली होती. ते स्वतः एक उत्तम प्रशासक होते. महाराजांनी कृतीशील व्यवस्थापन स्वराज्यामध्ये लागू केले होते. सर्व व्यवस्थापनेचे काम विविध खात्यांमध्ये विभागले गेले होते आणि प्रत्येक खात्याचे काम आणि जबाबदारी अतिशय विचारपूर्वक आखली गेली होती. त्यामध्यमातून त्यांनी रयतेला सेवा सुविधा उपलब्ध केल्या. त्यांच्या या प्रशासन कार्याचा आदर्श घेऊन सर्वांनी काम करणे अपेक्षित आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.

शुक्रवारी ६ जून रोजी शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने महानगरपालिकेच्या वतीने व मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड आदी संघटनांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यात आले. यावेळी आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे, सहाय्यक आयुक्त मेहेर लहारे,शहर अभियंता मनोज पारखे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन धस, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष अभियंता सुरेश इथापे, जिल्हाध्यक्ष (दक्षिण) ऍड. स्वाती जाधव,प्रदेश संघटक राजश्री शितोळे,लतिका पवार,सौ.मुळे, सौ. कर्डिलेअभियंता श्रीकांत निंबाळकर, राजेंद्र मेहेत्रे, महादेव काकडे, अनिल लोंढे आदी उपस्थित होते.आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी जनतेचे स्वराज्य स्थापनेचे स्वप्न पूर्ण केले. त्यांचा राज्याभिषेक झाल्यावर राजे म्हणून काम करताना त्यांनी जनतेच्या मनात विश्वास, धैर्य, सन्मान, सुरक्षीतता, निर्माण केली.

# मंत्री शंभुराजे देसाईंच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटाचा आज मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने सुरू केली असून त्याच पार्श्वभूमिवर येत्या ७ जून रोजी शनिवारी जिल्ह्यातील शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा मेळावा येथील माऊली संकूल सभागृहात दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आला आहे. पक्षाचे संपर्कमंत्री शंभुराजे देसाई या मेळाव्याला उपस्थित राहून निवडणुकीबाबतची रणनिती स्पष्ट करणार असल्याची माहिती जिल्हाप्रमुख अनिल शिंदे व कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

शिंदे म्हणाले, शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणाऱ्यांची संख्या वाढत आहे. या मेळाव्यात देखील श्रीगोंदा व पाथर्डी तालुक्यातील चार माजी पंचायत समिती सदस्य तसेच अहिल्यानगर शहरातून काही माजी नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. पक्षात दिवसेंदिवस कार्यकर्त्यांची संख्या वाढत असल्याने जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका व महापालिका निवडणुकीमध्ये उमेदवारीसाठी इच्छुकांची मोठी गर्दी राहणार आहे. याचा विचार करून पक्षाने आतापासून निवडझुकीची तयारी सुरू केली आहे. दोन दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सर्व संपर्कमंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी ज्या सुचना दिल्या आहेत. त्या पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी मंत्री शंभुराजे देसाई यांच्या उपस्थित मेळावा आयोजित करण्यात आला आहे.

### मुरकुटे व छल्लारे घेणार शिवधनुष्य हाती

श्रीरामपूरचे माजी आमदार व अशोक कारखान्याचे अध्यक्ष भानुदास मुरकुटे व माजी नगरसेवक संजय छल्लारे येत्या शनिवारी मुंबईत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश करणार आहे. त्यामुळे श्रीरामपूर तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढणार आहे. मुरकुटे यापूर्वी शिवसेने होते. त्यांनी कोपरगाव मतदारसंघात पक्षाकडून निवडणूक लढली होती. त्यानंतर ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये गेले. त्यानंतर स्थानिक पातळीवर लोकसेवा मंडळाची स्थापन करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका त्यांनी लढल्या होत्या. त्यानंतर त्यांनी लोकसभा निवडणुकीपूर्वी बीआरएस पक्षात प्रवेश केला. मात्र तेथे ते फार काळ रमले नाही. आता ते शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहेत.

# चांगले अधिकारीच जनतेमध्ये लोकप्रिय – मंजुषा गुंड

## ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचा सेवापूर्ती सोहळा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** प्रशासनामध्ये चांगले काम करणाऱ्या अधिकारी, सर्वसामान्य जनतेमध्ये खऱ्या अर्थाने लोकप्रिय असतात. आणि अशा अधिकाऱ्यांच्या सेवानिवृत्ती नंतर ही पोकळी भरून निघत नाही, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष मंजुषा गुंड यांनी कर्जत येथे बोलताना प्रतिपादन केले.

ग्रामपंचायत विभागात चार दशके प्रामाणिक सेवा बजावलेल्या ग्रामपंचायत अधिकारी चंद्रकांत तापकीर यांचा सेवापूर्ती सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्याला राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा मंजुषा गुंड होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा बँकेचे संचालक व बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर, जिल्हा बँकेचे दुसरे संचालक अंबादास पिसाळ, माजी नगराध्यक्षा उषा राऊत, अशोक खेडकर, सुनील शेलार, सचिन घुले पाटील, अमृत काळदाते, हर्षदा काळदाते, प्राथमिक शिक्षक बँकेचे अध्यक्ष बाळासाहेब तापकीर, उपसरपंच दरेकर आणि गटविकास अधिकारी रूपचंद जगताप यांच्यासह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते.

ग्रामविकासाच्या कार्यात त्यांनी घेतलेली शिस्तबद्धता, निःपक्षपाती भूमिका, आणि लोकांशी असलेला सलोख्याचा संबंध याचा अनेकांनी उल्लेख केला. अंबादास पिसाळ, काकासाहेब तापकीर, उषा राऊत, अशोक खेडकर, सचिन घुले, सुनील शेलार,शिक्षक बँकेची माजी चेअरमन श्री. सुद्रिक, श्री. तापकीर, श्री. गांगर्डे यांच्यासह अनेकांची भाषणे झाली.

# शिवरायांचे विचार आचरणात आणावेत – आ. अमोल खताळ

## शिवराज्याभिषेक दिनानिमित्त महाआरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** स्वतःच्या स्वार्थासाठी नव्हे तर रयतेच्या हितासाठी स्वराज्य स्थापन करणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराजांचे आचार विचार सर्वांनी आचरणात आणावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे महायुतीच्या वतीने शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित कार्यक्रमात आमदार खताळ बोलत होते. शिवराज्याभिषेक दिना निमित्त आमदार खताळ यांच्या हस्ते छत्रपतीं शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला दुग्धाभिषेक करून महाआरती करण्यात आली. यावेळी आमदार अमोल खताळ आणि इतर महायुतीच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. आमदार खताळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांनी जसे रयतेच्या हिता साठी काम केले तसेच त्यांच्या आदर्श विचाराचा अंगीकार करून रयतेच्या हितासाठी काम करण्याचा आमचा प्रयत्न सुरू आहे. आमदार झाल्यानंतर आपण प्रथमच संगमनेर शहरात सर्व महापुरुषांच्या जयंती उत्सव साजरे केले जातील, असे जाहीर केले होते. त्यानुसार संगमनेर मध्ये प्रत्येक महापुरुषाची जयंती उत्सव धुमधडाक्यात साजरे करत असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी महायुतीचे रामभाऊ राहणे, प्रमोद राहणे, संभाजी गुंजाळ, दिनेश फटांगरे, विनोद सूर्यवंशी, रमेश काळे, ज्ञानेश्वर कर्पे, शिरीष मुळे, कैलास कासार, ॲड. संग्राम जोंधळे, पायल ताजणे, ज्योती भोर, दिपाली वाव्हळ, सौरभ देशमुख, शशांक नामन, राहुल भोईर,अमोल दिघे, आशिष कानवडे, ॲड. संदीप जगनर, शैलेश फटांगरे, सुशील शेवाळे, वरद बागुल, निलेश गुंजाळ, संपत गलांडे, अक्षय वर्पे, रणजीत जाधव, सार्थक शेवाळे, योगेश गुंजाळ, समर्थ कट्यारे, दिलीप खताळ, बाळा साहेब व्यवहारे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नेप्ती कांदा बाजारात २६ हजार क्विंटल गावरान कांदा

## केवळ दोनशे रुपयांनी भावामध्ये झाली वाढ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नेप्ती कांदा मार्केट यार्डात गुरुवारी २६,००४ क्विंटल गावरान कांद्याची आवक झाली. या लिलावात एक नंबर कांद्याला १,३०० ते १, ७०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला, तर काही अपवादात्मक गोण्यांना १, ८०० रुपये भाव मिळाला. मागील चार दिवसांच्या तुलनेत कांद्याच्या भावात २०० रुपयांची वाढ झाली असली, तरी शेतकऱ्यांना अपेक्षित असलेला भाव अजूनही मिळत नाही.

खरीप पेरणीच्या तयारीसाठी शेतकऱ्यांना पैशाची गरज असल्याने कांद्याची आवक वाढली आहे. मात्र, गेल्या वर्षीच्या ५,००० रुपये प्रतिक्विंटलच्या तुलनेत सध्याचे भाव कमी असल्याने शेतकरी हवालदिल आहेत. अहिल्यानगरच्या नेप्ती कांदा मार्केट यार्डात गुरुवारी ४७,२८९ गोणी (२६,००४ क्विंटल) गावरान कांद्याची आवक झाली. लिलावात एक नंबर कांद्याला १,३०० ते १,७०० रुपये, दोन नंबर कांद्याला ९०० ते १,३०० रुपये, तीन नंबर कांद्याला ६०० ते ९०० रुपये, तर चार नंबर कांद्याला २०० ते ६०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. यापैकी ५२ गोण्यांना उच्च दर्जामुळे १,७०० रुपये आणि ५७ गोण्यांना



१,८०० रुपये प्रतिक्विंटल भाव मिळाला. मागील चार दिवसांच्या तुलनेत भावात २०० रुपयांची वाढ झाली असली, तरी शेतकऱ्यांना उत्पादन खर्च भागवण्यासाठी किमान २,५०० रुपये प्रतिक्विंटल भावाची अपेक्षा आहे. बाजार समितीत २३६ गाड्या कांद्याची आवक झाली, ज्यामुळे बाजारात चांगली चुरस दिसून आली.

सध्या खरीप हंगामाच्या पेरणीची तयारी सुरू आहे. यासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि इतर साहित्य खरेदीसाठी पैशाची गरज आहे. यामुळे अनेक शेतकरी आपला साठवलेला कांदा बाजारात विक्रीसाठी आणत आहेत, ज्यामुळे नेप्ती मार्केट यार्डात कांद्याची आवक वाढली आहे.

### कांद्याच्या लागवडीत वाढ

गेल्या वर्षीच्या चांगल्या भावामुळे अहिल्यानगर जिल्ह्यात कांद्याच्या लागवड क्षेत्रात लक्षणीय वाढ झाली. सव्वादोन लाख हेक्टरवर लागवड झाल्याने यावर्षी कांद्याचे बंपर उत्पादन झाले आहे. शेतकऱ्यांनी कांदा साठवणुकीला प्राधान्य दिले आहे, कारण त्यांना भाववाढीची अपेक्षा आहे. मात्र, सध्याच्या बाजारभावामुळे अनेक शेतकरी कांदा विक्रीऐवजी साठवणूक करत आहेत. अवकाळी पावसामुळे काही शेतकऱ्यांचे कांद्याचे नुकसान झाले असून, चाळीच्या सुविधेचा अभाव असल्याने त्यांना कांदा विक्रीशिवाय पर्याय नाही. यामुळे बाजारात आवक वाढली असली, तरी भाव स्थिर राहण्याची शक्यता आहे.

# निळवंडेचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात आल्याने स्वप्नपूर्ती

## माजीमंत्री बाळासाहेब थोरात; घुलेवाडी येथे मोठ्या उत्साहात बंधाऱ्याचे जलपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : निळवंडे धरण हे आपल्या जीवनातील ध्यासपर्व मानून आपण सातत्याने काम केले. मंत्रिमंडळात विविध मंत्रिपदाच्या माध्यमातून धरण व कालव्यांच्या कामासाठी निधी मिळवला व काम सुरू ठेवले. आता उजव्या व डाव्या कालव्यातून आलेले पाणी शेतकऱ्यांच्या शेतात आल्याने स्वप्नपूर्ती झाली असून कालव्यांच्या वरील भागातील जे शेतकरी आहेत त्यांनाही पाणी देण्यासाठी आपला पाठपुरावा सुरूच असल्याचे प्रतिपादन कालव्यांचे निर्माते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.

दुष्काळी भागातील प्रत्येक शेतकऱ्याला पाणी देणे हे आपले स्वप्न असून त्यासाठी काम करत आहोत. आवश्यक तेथे थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून विविध गावांमध्ये आपली यंत्रणा देऊन चारी खोदून बंधारे भरून देण्यात आले आहे. तर अनेक ठिकाणी पाईप देऊन पाणी उचलले गेले आहे. आणि शक्य तिथपर्यंत पांणी देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**



घुलेवाडी येथे जलपूजन प्रसंगी कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सरपंच निर्मला राऊत, नवनाथ आरगडे, भाऊसाहेब पानसरे, तंटामुक्ती अध्यक्ष बाळासाहेब पानसरे, भास्कर पानसरे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ज्येष्ठ कार्यकर्ते व युवक कार्यकर्ते तसेच घुलेवाडी वि. का. सेवा सोसायटीचे चेअरमन, व्हा. चेअरमन, पतसंस्था, तंटामुक्ती व गावातील सर्व युवक संघटनांचे पदाधिकारी या पाण्यासाठी मेहनत घेतलेले सर्व शेतकरी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी गावातील तरुणांनी वाजत गाजत माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांची भव्य मिरवणूक काढून भेंडाळे बंधारा येथे साडीचोळी अर्पण करून पाण्याचे पूजन केले.

माजी प्रांताध्यक्ष थोरात म्हणाले की, निळवंडे धरणाच्या डाव्या आणि उजव्या कालव्यातून पाणी आल्याने संगमनेर तालुक्यात आता जलसमृद्धी निर्माण झाली आहे. अनेक गावांना या धरणाचे पाणी मिळाले असून कालव्यांच्या वरच्या बाजूस असलेल्या उर्वरित शेतकऱ्यांनाही पाणी मिळवून देण्यासाठी आपण नियोजित आराखडा तयार केला सत्ता बदलली तरी या कामाचा आपला सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. तर सरपंच राऊत म्हणाल्या की, माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्यामुळेच निळवंडे धरणाचे पाणी डाव्या व उजव्या कालव्यातून सर्वांना मिळाले आहे. याप्रसंगी गावातील अनेक नागरिकांनी आपले मनोगत व्यक्त करत पाणी मिळवून दिल्याबद्दल माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांचे अभिनंदन करून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी घुलेवाडी परिसरातील अनेक नागरिक, युवक, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धरण व कालव्यांची काम हे माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले मात्र दुर्दैवाने शेवटच्या काही दिवसात सत्ता परिवर्तन झाले आणि या कामात ज्यांनी अडथळे निर्माण केले. ज्यांचे या कामात काही योगदान नाही ती आता श्रेय घेण्याचा प्रयत्न करत आहे मात्र जनतेला माहित आहे धरण व कालव्यांची कामे कोणी पूर्ण केली.

**– नवनाथ आरगडे**

# महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त जनजागृती रॅली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड या कंपनीच्या स्थापनेला वीस वर्षे पूर्ण होत असून, या वर्धापन दिनानिमित्त कर्जत शहरात जनजागृती रॅलीसह विविध उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. महावितरणचे कार्यकारी अभियंता विजय माळी यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम यशस्वीरीत्या पार पडले. यावेळी कर्जत जामखेड श्रीगोंदा व बेलवंडी या महावितरणच्या कार्यालयामधील सर्व अधिकारी व कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जनहित कार्यक्रमांची नियमित आवश्यकता

विजेचा सुरक्षित वापर कसा करावा, घरगुती वीज उपकरणांपासून कोणत्या खबरदाऱ्या घ्याव्यात याबाबत माहितीपत्रकांचे वाटप शहरातील विविध भागांत करण्यात आले. स्थानिक नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक करत, अशा जनहित कार्यक्रमांची नियमित आवश्यकता आहे.

या विशेष दिनाचे औचित्य साधून महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत जनजागृती रॅली काढली. विजेचा वापर सावधगिरीने करा, सुरक्षिततेची हमी द्या, अशा प्रकारच्या घोषणांनी शहर दुमदुमून गेले.



महावितरण कंपनीला वीस वर्षे पूर्ण झाले आहेत या निमित्ताने एक जून ते सहा जून असा सुरक्षा पंधरवाडा कर्जत उपविभागामध्ये विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला.

**– विजय माळी, कार्यकारी अभियंता**

विजेचा सुरक्षित आणि कार्यक्षम वापर, ऊर्जा बचतीचे महत्त्व, तसेच अपघात टाळण्याच्या उपाययोजनांबाबत जनतेला जागरूक करण्याचा यामागचा उद्देश होता. महावितरण कंपनीच्या वतीने अपघात टाळण्यासाठी कोणत्या कोणती काळजी घ्यावी या विषयी माहिती असणारी पत्रके कर्जत शहरांमध्ये सर्व नागरिकांना याचे वाटप करण्यात आले.

या यानिमित्ताने चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा आणि प्रश्नमंजुषा यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शाळांतील विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत त्यांच्या कलेतून व लेखणीतून ऊर्जा संवर्धन व सुरक्षिततेचा संदेश दिला. यामुळे विद्यार्थ्यांमध्येही ऊर्जा विषयक जागरूकता वाढीस लागली.

# कृषिदूतांनी दिले नाविन्यपूर्ण शेतीचे धडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : सोनई येथील मुळा एज्युकेशन सोसायटीच्या कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरुकता कार्यानुभव व कृषी औद्योगिक संलग्नक कार्यक्रमांतर्गत नेवासा तालुक्यातील खामगाव येथील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ग्रामपंचायतीच्या वतीने या कृषिदूतांचे स्वागत करण्यात आले.



ओमकार जानकर, प्रथमेश कदम, प्रणव घोरपडे, विवेक गलांडे, व देविदास हिंदोळे या कृषिदूत विद्यार्थ्यांनी गावातील शेतकऱ्यांना आधुनिक कृषी तंत्रज्ञान, उत्पादनवाढीच्या पद्धती व नवीन संशोधनाविषयी मार्गदर्शन केले. हे विद्यार्थी गावातच काही महिने राहणार असून ते शेतकऱ्यांना आधुनिक शेतीबाबत मार्गदर्शन करणार आहेत.

कार्यक्रमाच्या कालावधीत कृषिदूत गावामध्ये प्रत्यक्ष सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी, ग्रामीण जीवनमान, सामाजिक व आर्थिक स्तर, नैसर्गिक साधनसंपत्ती, सामाजिक स्थिती, पीक पद्धती यांचा सखोल अभ्यास करणार आहेत. तसेच, विविध कृषी विषयांवर प्रात्यक्षिके आणि मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करणार आहेत.

कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, उपप्राचार्य प्रा. सुनील व्ही. बोरुडे, कार्यक्रम समन्वयक डॉ. अतुल दरंदले व कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. बी. चौगुले यांचे कार्यक्रमाला मार्गदर्शन करणार आहे. या स्वागतप्रसंगी गावाचे ग्रामसेवक भाऊसाहेब चिमटे, प्रशासकीय अधिकारी एन. डी. पाखरे, कृषीसेवक गायकवाड साहेब, तसेच गावातील मान्यवर अशोक नारळकर, सखाराम सोलट, निमराज आगळे व इतर ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघाची बैठक उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : समाजातील प्रत्येक घटकाच्या न्याय हक्कासाठी भारत सरकार मान्यताप्राप्त राष्ट्रीय विश्वगामी पत्रकार संघ व समाजकार्य या संघटनेची बैठक नगरमधील शासकीय विश्रामगृहावर विविध विषयावर संपन्न झाली. यावेळी राज्यस्तरावरील विविध पदधिकाऱ्यांच्या निवडी करून नियुक्ती पत्र राज्य कार्याध्यक्ष रोडे यांच्या हस्ते देण्यात आले



यामध्ये महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नानासाहेब जगताप, उत्तर विभाग कार्यध्यक्ष संजय वाल्हेकर, संपर्क प्रमुख भगवानराव गोरखे, महाराष्ट्र वारकरी संप्रदाय उपाध्यक्ष साहेबराव पाचरणे, महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्ष दक्षिण विभाग प्रतिभा धस तसेच जिल्हा उपाध्यक्ष संजय शिंदेसह संघटक पिनू भोसले, शहर संघटक संकेत शिरसाठ, राहुरी तालुका संघटक राजेंद्र भोसले, जिल्हा संघटक किसनराव साळवे, जिल्हा उपाध्यक्ष महिला अलका बोरुडे यांची निवड करून नियुक्ती करून पत्रे देण्यात आली.

यावेळी नामदेव चांदणे, बाळासाहेब मोरे, जेम्स ससाणे, सुभाष शिरसाठ, नाशिक जिल्हा संघटक अंजली लाळगे, सुनीता आढाव, स्वाती दातीर, आण्णा विटकर, संदीप गायकवाड, शनी धस, अशोक नवले, संदीप कापरे, मनोज जाधव, गोरख शेरे, शेलार, किशोर ससाणे आदी उपस्थित होते.

बैठकीत जिल्ह्याचा आढावा घेण्यात आला व पदाधिकाऱ्यांनी समाजकार्य मोठ्या प्रमाणात करून गरजू ना मदत करावी, असे रोडे यांनी सांगितलेत निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांची राष्ट्रीय अध्यक्ष संतोष निकम, राष्ट्रीय महासचिव रमेश देसाई, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष वैभव पाटील यांनी अभिनंदन केले आहे.

# काकडे विद्यालयात खो–खो प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : अहिल्यानगर जिल्हा क्रीडा कार्यालय आणि आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आबासाहेब काकडे विद्यालयात आयोजित करण्यात आलेले खो–खो खेळाचे १० दिवसीय विशेष प्रशिक्षण शिबिर नुकतेच उत्साहात संपन्न झाले.

या शिबिरात जिल्ह्यातील अनेक युवा खेळाडूंनी सहभाग घेऊन खो–खो खेळाचे बारकावे आत्मसात केले. शिबिराचे नियोजन आणि मार्गदर्शन जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, क्रीडा मार्गदर्शक संतोष वाबळे, विशाल गर्जे, प्रियांका खिंडरे यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले.

या मान्यवरांनी खेळाडूंना केवळ तंत्रशुद्ध प्रशिक्षणच दिले नाही, तर त्यांना खेलाडूवृत्ती, सांघिक भावना आणि शिस्त यांसारख्या महत्त्वाच्या मुल्यांचीही शिकवण दिली. यामुळे खेळाडूंचा सर्वांगीण विकास साधण्यास मदत झाली.



या शिबिराच्या समारोप प्रसंगी आबासाहेब काकडे विद्यालयाचे प्राचार्य माननीय संपत दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे ,सचिन आधाट, खो–खोचे मार्गदर्शक संतोष ढोले, सचिन वाल्हेकर, क्रीडा शिक्षक कल्पेश भागवत, विक्रम घुटे, यांच्यासह अनेक खो–खो प्रेमी उपस्थित होते.

यशस्वी शिबिराचे संस्थेचे अध्यक्ष अ‍ॅड. डॉ. विद्याधर काकडे, महिला व बालकल्याण समिती माजी सभापती हर्षदा काकडे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. डॉ. लक्ष्मणराव बिटाळ, शालेय शिक्षण विभाग प्रमुख वंदना पुजारी, सहप्रमुख अशोक आहेर, अंजली चिंतामण, प्राचार्य संपतराव दसपुते, उपमुख्याध्यापिका पुष्पलता गरुड, पर्यवेक्षक सुनील आव्हाड, लक्ष्मण गाडे यांनी शिबिराचे विशेष कौतुक केले.

# श्री शिव गोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक महामंडळ नामांतर करा : शिंदे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : विधानसभा निवडणुकीआधी महायुती सरकारने भटक्या विमुक्त जाती–जमातीतील नाथपंथी समाजासाठी वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जाती आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत उपकंपनी म्हणून स्थापन करण्यात आलेल्या महामंडळाला श्री शिवगोरक्षनाथ नाथपंथी समाज आर्थिक महामंडळ असे नामांतर करण्यात यावे, अशी मागणी अखिल भारतीय हिंदू नाथपंथी समाज अहिल्यानगरचे जिल्हा प्रमुख बाबासाहेब शिंदे यांनी समाजाचे प्रांताध्यक्ष व सेवानिवृत्त पोलीस उप–अधीक्षक मच्छिंद्र चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

पुणे येथे नुकतेच अखिल भारतीय हिंदू नाथपंथी समाज महासंघ या बैठकीत उपस्थित राहुन भटक्या विमुक्त विकास महामंडळ वसंतराव नाईक उपकंपनी श्री शिव गोरक्षनाथ नाथ पंथी समाज आर्थिक महामंडळ नामांतर करा.

– बाबासाहेब शिंदे, जिल्हाप्रमुख

अखिल नाथपंथी डवरी गोसावी, नाथजोगी, नाथबाबा, गोंधळी, बहरूपी, भारूडी या भिक्षुक, भटक्या जाती–जमातीच्या राज्यभरातील समाजबांधवांनी पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे राज्यस्तरीय बैठक घेऊन महामंडळाचे नामांतर करण्याचा ठराव मंजूर केला. मच्छिंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात झालेल्या या बैठकीला निवृत्त महसूल उपायुक्त आनंदराव जगताप, महादेव शिंदे, डॉ. जयाजी नाथ, नारायण शिंदे, भालचंद्र सावंत, अंबरनाथ इंगोले, डॉ. सुभाष भोसले, सुमित लगस, मोहन



शिंदे, बाबा शिंदे, संजय सावंत, संजय जगताप, अशोक शिंदे, अविनाश शिंदे, दयानंद सावंत, गणेश लगस, अनिल चव्हाण, सहदेव सावंत, अ‍ॅड. नवनाथ शिंदे यांच्यासह मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभाग या राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारोंच्या संख्येने नाथपंथी समाजबांधव उपस्थित होते. मच्छिंद्र चव्हाण म्हणाले, विधानसभा निवडणुकीच्या आधी महायुती सरकारने नाथपंथी समाज आर्थिक विकास महामंडळ घोषित केले. याचे स्वागत आम्ही करतो.

# रहमत सुलतान फाउंडेशनकडून होळकरांना अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : भारतीय इतिहासात मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली. परंतु या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या कार्याने समाजहित आणि जनकल्याण या मूल्यांना सर्वोच्च मान दिला. त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांच्या जीवनकार्याने सिद्ध केलं की एका स्त्रीचं नेतृत्व केवळ राजसिंहासना पुरतं मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकतं.

अहिल्यादेवी होळकर या केवळ इंदूरच्या होळकर घराण्याच्या महाराणी नव्हत्या तर त्या एक न्यायप्रिय नेत्या, समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त, त्यांचे स्मरण त्यांच्या विचारांमधून नव्याने प्रेरणा घेण्याचे निमित्त आहे, असे प्रतिपादन रहमत सुलतान फाउंडेशनचे अध्यक्ष युनूस तांबटकर यांनी केले.

मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व रहमत सुलतान फाउंडेशन तर्फे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी युनुस तांबटकर, हनीफ बाबूजी, आरिफ सय्यद, आसिफ दुलेखान, डॉ. कमर सुरूर, संध्या मेढे, जावेद मास्टर, अबरार शेख आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. कमर सुरुर व संध्याताई मेढे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन आबीद दुलेखान यांनी केले. तर आभार आरिफ सय्यद यांनी मानले. कार्यक्रमास मखदूम सोसायटी, रहमत सुलतान फाउंडेशन व अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळ आदींचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ. जगतापांच्या नेतृत्वात स्वच्छ सुंदर, हरित नगर करणार

## संपत बारस्कर; अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्र. १ मध्ये वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : ऋतुमानात दिवसेंदिवस बदल होत चालला असून, कोणत्याही ऋतूमध्ये ऊन, वारा, पाऊस पडताना दिसत आहे. त्यामुळे पर्यावरणाची हाणी होत आहे. व मनुष्याच्या जीवनावर विपरीत परिणाम होत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण व संवर्धन ही काळाची गरज आहे. आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली स्वच्छ सुंदर हरित नगर करायचे आहे. आता शहरांमध्ये रस्ता काँक्रिटी करण्याचे कामे सुरू आहेत. त्या रस्त्यांच्या बाजूला वृक्षारोपण केले जाणार आहे. तरी नागरिकांनी वृक्षारोपणाची लोक चळवळ उभी करावी, असे प्रतिपादन माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांनी केले.

प्रभागातील नागरिकांना मागेल त्याला वृक्ष झाड देणार असून त्यांनी त्या, झाडाचे संवर्धन करणे गरजेचे आहे. मागील ५ वर्षापासून प्रभागांमध्ये वृक्षारोपणाची लोक चळवळ उभी केली, असल्यामुळे प्रत्येक नागरिकांच्या दारासमोर आंब्याचे झाड दिसत आहे. त्यामुळे माझा प्रभाग हरित प्रभात म्हणून ओळखला जात आहे. विकासाच्या कामाबरोबर नागरिकांना बरोबर घेऊन सामाजिक उपक्रम राबवले जात आहे.

**– संपत बारस्कर**

पर्यावरण दिनाच्या निमित्ताने शहरातील झाडांवर लावलेल्या जाहिराती काढणे, फांद्यांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा काढण्याची मोहीम महानगरपालिकेमार्फत सुरू करण्यात आली आहे. शहरातील अनेक झाडांवर खिळे ठोकून पोस्टर, बॅनर लावून जाहिराती केल्या जात आहेत.

**– संतोष टेंगले, उपायुक्त**

अहिल्यानगर महानगर पालिकेच्या वतीने प्रभाग क्र. १ मध्ये जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भिस्तबाग महाल परिसरामध्ये वृक्षरोपण नागरिकांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर, आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त संतोष टेगळे, माजी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, शिवाजी चव्हाण, हभप संदीप महाराज खोसे, रंजना उकिरडे, डॉ. चंद्रकांत बारस्कर, कारभारी शेंडे, रावसाहेब बारस्कर, संभाजी बारस्कर, किसन कजबे, शुभम बारस्कर, देविदास बारस्कर, शशिकांत नजन, नितीन नजन, अशोक साबळे, संपत बारस्कर आदींसह प्रभागतीत नागरिक उपस्थित होते.



आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, वृक्ष लागवड ही पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आवश्यक आहे. झाडे हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि ऑक्सिजन सोडतात. ज्यामुळे हवा शुद्ध होते आणि तापमान कमी होते. तसेच, झाडे मातीची धूप रोखतात, पाऊस नियंत्रित करतात, आणि पशू, पक्षी, वन्यजीवनासाठी निवारा उपलब्ध करतात.

झाडे आपल्या जीवनाला आवश्यक असलेल्या अनेक गोष्टी पुरवतात आणि पर्यावरणाचे संतुलन राखतात. त्यामुळे, आपल्याला जास्तीत जास्त झाडे लावून त्याचे संवर्धन करणे, माजी विरोधी पक्षनेते संपत बारस्कर यांचे वृक्षारोपण सुरू असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

# मुर्शतपूर येथील आरोग्य उपकेंद्राची दयनीय अवस्था

## ग्रामस्थांमध्ये नाराजीचा सुर; दोषींवर कारवाईची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : तालुक्यातील मुर्शतपूर गावातील आरोग्य क्रेंदाची दयनीय अवस्था झालेली आहे. विशेष म्हणजे या उपक्रेंद्रासाठी लाखो रुपयांचा खर्च केलेला आहे. हा खर्च पाण्यात गेल्याची भावना ग्रामस्थांनी केली आहे. आरोग्य सेवा पुरवण्याच्या हेतूने बांधलेली ही वास्तू सध्या अडगळीची वास्तू बनली आहे. सदर उपकेंद्राकडे जाण्यासाठी रस्त्याची अवस्था इतकी वाईट आहे की, पावसाळ्यात चिखलातून वाट काढावी लागते. वेड्या बाभळीच्या काट्यांनी वेढलेला परिसर, रस्ता नसल्याने अडथळ्यांनी भरलेली



वाट आणि त्यात दैनंदिन गरजेच्या आरोग्य सुविधांचा अभाव हे चित्र म्हणजे सरकारी उदासीनतेचे जिवंत उदाहरण म्हणावे लागेल. गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, येथे केवळ शुक्रवार या एका दिवशी एक कर्मचारी कसाबसा येतो आणि बारा वाजेपर्यंत निघून जातो. बाकीच्या दिवशी आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीत केवळ शांतता आणि ओसाडपणाच पाहायला मिळतो. त्यामुळे लहान अपघात असो वा गंभीर आजार गावकऱ्यांना जवळपास ५-७ किलोमीटर दूर असलेल्या टाकळी येथील आरोग्य केंद्राचा आधार घ्यावा लागतो. तिथे पोहोचण्यासाठी देखील चांगल्या रस्त्याच अभाव असल्याने नागरिकांना खडतर प्रवास करावा लागतो. यामुळे वृद्ध, गर्भवती महिला आणि आपत्कालीन रुग्णांसाठी ही परिस्थिती अक्षरशः जीवावर बेतणारी ठरते आहे. शासनाने तातडीने याकडे लक्ष देऊन आरोग्य उपकेंद्रात डॉक्टर व कर्मचारी नियुक्त करावेत, तसेच रस्त्याची सुधारणा करून ये-जा सुलभकरावी आणि या संदर्भात संबंधित विभागाच्या निर्णय प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, या सगळ्या प्रकाराची सखोल चौकशी करून दोर्षीवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी गावकऱ्यांकडून करण्यात आली आहे.

### सगळ्यांचीच डोळेझाक

या आरोग्य उपकेंद्रात ना डॉक्टर, ना परिचारिका, ना आरोग्य सेवक राहत असल्याने लाखो रुपये खर्च करून उभी राहिलेली ही इमारत केवळ आराखड्यावर झालेली कामगिरी म्हणून शिल्लक राहिली आहे. या बाबतीत प्रशासनाने सतत दुर्लक्ष केले असून, अधिकारी डोळे असूनही आंधळेपणाने वागत असल्याचे चित्र आहे. यावरुन तालुका आरोग्य विभागाचे ढिसाळ नियोजन यातून दिसून येते आहे.

# गोळीबार प्रकरणी गावठी कट्टयासह एकास अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : तपोवन रोडवरील आयरिश हॉस्पीटल परिसरात झालेल्या गोळीबार प्रकरणात वापरलेल्या गावठी कट्टयासह एकास तोफखाना पोलिसांनी गुरुवारी अटक केली. अकिब दाऊद शेख (रा. कविजंगनगर, गुलमोहर रोड, सावेडी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. तपोवन रोडवरील आयरिश हॉस्पीटलसमोर रविवारी मध्यरात्री गोळीबार झाला होता.



याप्रकरणी मयुर नंदकुमार फणसे, आकाश रोहिदास नसाणे, कुणाल विनायक मराठे (सर्व रा. ढवणवस्ती) अशा तिघा जणांना सोमवारी पहाटे अटक करण्यात आली आहे. उर्वरित राहुल सांगळे व भिमराज आव्हाड हे दोघे घटना घडल्यापासून फरार आहेत. ते अद्याप सापडलेले नाहीत. यातील आरोपी शेख हा मिरावली दर्गा परिसरात लपून बसला आहे, अशी माहिती तोफखाना पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक आनंद कोकरे यांना मिळाली होती.

त्यानुसार पोलिस उपनिरिक्षक शैलेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखालील पथक आरोपीच्या शोधासाठी रवाना झाले. पोलिसांनी वेशांतर करून परिसरात सापळा रचला. आरोपीला मोठ्या शिताफीने अटक केली.

# गुहा येथे पती-पत्नीस मारहाण

## राहुरी पोलिसांत चार जणांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : 'तुम्ही रस्त्याच्या कडेला नांगरट करू नका', असे म्हणून दाम्पत्याला लाकडी काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी तालुक्यातील गुहा येथे घडली. मंदा कैलास सौदागर (वय ५२) रा. गुहा ता. राहुरी यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले, मंदा सौदागर यांच्या घराचे शेजारी रविंद्र ज्ञानदेव काकडे हा त्याच्या कुटुंबासह राहत असून दोघांमध्ये रस्त्याच्या कारणावरून नेहमी वाद होत असतात. १ जून रोजी सायंकाळी ६.३० वाजता फिर्यादी मंदा सौदागर व त्यांचे पती शेतात नांगरट चालू असल्याने शेतामध्ये थांबले होते. तेव्हा आरोपी तेथे आले व म्हणाले की, तुम्ही रस्त्याच्या कडेला नांगरट करू नका. तेव्हा मंदा सौदागर यांचे पती त्यांना म्हणाले की, आम्ही रस्त्याच्या कडेला नांगरट केली नाही. आम्ही आमच्या शेतात नांगरट करत आहोत. असे म्हणाल्याचा आरोपींना राग आल्याने त्यांनी मंदा सौदागर व त्यांच्या पतीला शिवीगाळ करून लाकडी काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. याबाबत मंदा कैलास सौदागर यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी रविंद्र ज्ञानदेव काकडे, जालिंदर ज्ञानदेव काकडे, लिलाबाई ज्ञानदेव काकडे, कुणाल रविंद्र काकडे, सर्व रा. गुहा, ता. राहुरी या चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# साईभक्तांकडून पाच शिल्पांची अनमोल भेट

## तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातील साईभक्तांचा केला सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : देश-विदेशातील लाखो साईभक्तांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू असलेल्या श्री साईबाबा संस्थानला आज एक अनोखी भेट प्राप्त झाली. दक्षिण भारतातील तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातील पाच साईभक्त कुटुंबांनी आपली नितांत श्रद्धा आणि भक्तिभाव व्यक्त करत श्री साईबाबांची वेगवेगळी पाच शिल्प श्री साईबाबा संस्थानला दान दिली.

या शिल्पांचे अनावरण श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, (भा.प्र.से.) आणि संबंधित



देणगीदार साईभक्तांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी संदीपकुमार भोसले, प्रज्ञा महांडुळे-सिनारे, विश्वनाथ बजाज, कार्यकारी अभियंता भिकन दाभाडे, सहाय्यक अभियंता स्वप्निल गायकवाड, मॅकेनिकल विभाग प्रमुख अतुल वाघ, श्री साईप्रसाद निवासस्थान विभागप्रमुख प्रविण मिरजकर यासह संस्थानचे कर्मचारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाचही शिल्पे कलात्मकतेचा उत्कृष्ट नमुना असून संस्थानच्या विविध ठिकाणी ही शिल्पे बसविण्यात आली आहेत. हैद्राबाद, तेलंगाणा येथील के. मोहन रेड्डी आणि श्रीमती के. श्रीदेवी यांनी दान दिलेले दगडावर बसलेले साईबाबांचे शिल्प व सिकंदराबाद, तेलंगाणा येथील प्रकाश चन्नावर व श्रीमती गीता चन्नावर यांचे लोडवर टेकून बसलेले साईबाबांचे शिल्प नवीन दर्शन रांगेत स्थापन करण्यात आले.

कोरुतला व्हिलेज, तेलंगाणा येथील ए. वेणुगोपाल व श्रीमती ए. शोभा यांचे दगडावर बसून आशिर्वाद देणारे साईबाबांचे शिल्प नवीन शैक्षणिक संकुलात ठेवण्यात आले. विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश येथील जी. श्रीनिवास व श्रीमती जी. श्रद्धा यांचे फळीवर निद्रावस्थेत असलेले साईबाबांचे शिल्प द्वारावती भक्तनिवासात ठेवले गेले.

तर, हैद्राबाद, तेलंगाणा येथील श्रीमती ए. माया व ए. बाबूराव यांनी दिलेले द्वारकामाईत बसलेले साईबाबांचे शिल्प श्रीसाई आश्रम भक्तनिवासात प्रतिष्ठापित झाले.

# पर्यावरण दिनी संगमनेरात वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : जागतिक पर्यावरण दिनी संगमनेर नगरपरिषदेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. नगरपरिषदेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक रामदास कोकरे यांच्या हस्ते तसेच नगरपरिषदेच्या विविध विभागांतील अधिकारी, कर्मचारी यांच्या सहभागाने शहरातील कवी अनंत फंदी नाट्यगृह, देवाचा मळा तसेच माधव टॉकीज परिसरात विविध वृक्षांच्या रोपांचे रोपण करण्यात आले. उपस्थितांना वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन तसेच सिंगल यूज प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करता कागदी किंवा कापडी पिशव्यांचा वापर करण्याची शपथ देण्यात आली. पर्यावरणाचा समतोल



राखण्यासाठी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून नगरपरिषदेने शहरातील काही कारणास्तव काढलेल्या वृक्षांचे देखील पुनर्रोपण करण्यात आलेले आहे. माझी वसुंधरा अभियान अंतर्गत संगमनेर नगरपरिषदेच्यावतीने शहरात हरित संगमनेर संकल्पनेंतर्गत बहुतांश ठिकाणी वृक्षारोपण केलेले आहे. नागरिकांनीसुद्धा या मोहिमेत सहभागी होऊन नगरपरिषदेने लावलेल्या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्याचे आवाहन मुख्याधिकारी कोकरे यांनी केले. उपमुख्याधिकारी संजय पेखळे, प्रशासन अधिकारी प्रल्हाद देवरे, शहर अभियंता प्रशांत जुन्नरे, सहायक कार्यालय निरीक्षक राजेंद्र गुंजाळ, कर अधिकारी श्वेता शिंदे, प्रणोती पवार, वैष्णवी गडाख, अलका कोठवळ, पंकज मुंगसे, तुकाराम कानसकर, विशाल कोल्हे, प्रवीण ताजणे, बाळासाहेब साळवे, जालिंदर हिरे, वसंत मेहेर, शांताराम अभंग, शुभम नीचित, कुणाल चांगरे, प्रदीप जेधे, राहुल जेधे, जयराम मंडलिक, राजेंद्र म्हस्के, मच्छिंद्र काठे, विजय गाडेकर आदी उपस्थित होते.

# ३६ पोलीस चालकांच्या प्रशासकीय बदल्या

## पोलीस अधीक्षक घार्गे यांचे आदेश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : पोलीस अंमलदारांच्या बदल्या करण्यात आल्यानंतर आता जिल्ह्यातील ३६ चालक पोलीस अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्या करण्यात आल्या आहेत. येथील पोलीस मुख्यालयात बदली दरबार आयोजित करण्यात आला होता. यामध्ये या बदल्या करण्यात आल्या आहेत. रात्री उशिरा याबाबत पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी आदेश काढले आहेत. तात्कालीन पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या काळात जिल्ह्यातील प्रशासकीय बदलीपात्र पोलीस अंमलदार, चालक पोलीस अंमलदार यांचे तीन पसंती ठिकाणांसह अर्ज मागविण्यात आले होते. दरम्यान, ओला यांची मुंबई येथे बदली झाली व सोमनाथ घार्गे नूतन पोलीस अधीक्षक म्हणून जिल्ह्यात रूजू झाले. त्यांनी पदभार हाती घेताच सुमारे पावणे चारशे पोलीस अंमलदारांच्या प्रशासकीय बदल्या केल्या होत्या. दरबार आयोजित करून प्रत्येक अंमलदारांना त्यांच्या पसंती ठिकाण विचारात घेऊन बदली देण्यात आली होती. दरम्यान, पोलीस चालक अंमलदार यांच्या बदल्या अद्याप झाल्या नव्हत्या. त्यासाठी प्रशासकीय बदलीपात्र चालकांना बुधवारी येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर बोलविण्यात आले होते. अधीक्षक घार्गे, अप्पर अधीक्षक प्रशांत खैरे, उपअधीक्षक अमोल भारती यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील ३६ पोलीस चालकांच्या बदल्या करण्यात आल्या.

# वृंदावन कृषी महाविद्यालयाचा प्लास्टिक मुक्तीचा नारा

**जनता आवाज वृत्तसेवा**




**संगमनेर** : गड किल्ले ही राष्ट्राची संपत्ती असून भावी पिढ्यांसाठी स्फूर्तीस्थानं आहेत. त्यांचे पावित्र्य आणि स्वच्छता राखणे आहे म्हणून वृंदावन कृषी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शिवनेरी किल्ला परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. यावेळी 'प्लास्टिक टाळा, पर्यावरण वाचवा' असा संदेश देत त्यांनी किल्ला परिसरातील कचऱ्यासह प्लास्टिक जमा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली.

डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित वृंदावन कृषी महाविद्यालयाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन आणि शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविली. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी जिल्हा परिसरात स्वयंस्फूर्तीने स्वच्छता मोहीम राबविली.

प्लास्टिक मुळे पर्यावरणाचे मोठे नुकसान होते, हे पटवून देण्यासाठी स्वयंसेवकांनी प्लास्टिक दूर करू या. पर्यावरण वाचवूया, कापडी पिशवी घरोघरी. पर्यावरणाचे रक्षण करी, प्लास्टिकमुक्त पर्यटन, स्वच्छ किल्ला.. सुंदर किल्ला अशा घोषणा देत किल्ल्यावर आलेल्या पर्यटकांचे प्लास्टिकमुक्ती बाबत प्रबोधन केले.

संस्थेचे सचिव राहुल गुंजाळ आणि कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर रोहित उंबरकर यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. डॉ. योगेश एखंडे, प्रा. डॉ. जयसिंग लामटूळे, प्रा. डॉ. अनंता महाले, प्रा. डॉ. नितीन परजणे प्रा. आशिष सहाणे, प्रा. पूजा हापसे, प्रा. प्रतीक्षा गरजे यांच्या प्रयत्नातून ही मोहीम यशस्वीरित्या राबविली.

# बनावट पूजा ॲपची सायबर शाखेत तक्रार

## शनिशिंगणापूर देवस्थान : तीन एजन्सींज कार्यरत असल्याचे उघड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे ऑनलाइन पूजेत बोगस व बनावट ॲपद्वारे देवस्थानची व भाविकांची फसवणूक होत आहे. याबाबत देवस्थानकडे तक्रारी आल्यावर देवस्थान प्रशासन खडबडून जागे झाले. या बनावट ॲपबाबत देवस्थानने आता सायबर पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. काही भाविकांच्या तक्रारी आल्यानंतर देवस्थानने याबाबत चौकशी केली.



त्यामध्ये आत्तापर्यंत तीन एजन्सींनी बनावट पूजा सर्व्हिस ॲप तयार करून त्याद्वारे पूजा सर्व्हिससाठी भाविकांकडून ऑनलाइन रक्कम भरून घेत असल्याची माहिती मिळाली. त्यामध्ये हरिओम दर्शन ॲप, पूजापरी सेवा ॲप, कोलकाता आणि वामा ॲप गुडगाव (नवी दिल्ली) यांनी शिंगणापूर देवस्थानची कुठलीही परवानगी न घेता बनावट ॲप तयार करून भाविकांची आर्थिक फसवणूक केलेली असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले. शनिशिंगणापूर येथे अनधिकृत पूजा ॲपद्वारे भाविकांची लूट होत असल्याबद्दल काँग्रेसचे कामगार सेलचे संभाजी माळवदे, माजी विश्वस्थ डॉ. वैभव शेटे, छावाचे रावसाहेब काळे, शनिसाई प्रतिष्ठानचे विशाल सुरपुरिया आदींनी जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक आणि सार्वजनिक न्यास कार्यालय अहिल्यानगर येथे लेखी तक्रार केली. त्यानंतर देवस्थान प्रशासनाने तक्रार दाखल करण्याची कार्यवाही केली.

शनिशिंगणापूर पोलिस ठाण्यात सायबर तपास यंत्रणा नसल्याने तक्रार अहिल्यानगर सायबर शाखेत वर्ग केली आहे. सायबर शाखेच्या चौकशीअंती वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात येईल.

**आशिष शेळके, सहायक पोलिस निरीक्षक, शनिशिंगणापूर.**

# ज्ञानेश्वर विद्यालयात पर्यावरण दिन साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : कोपरगाव शहरातील संत ज्ञानेश्वर इंग्लिश मिडीअम स्कूल, सप्तर्षी मळा शाखा व जेऊर पाटोदा शाखा, कोपरगाव येथे जागतिक पर्यावरण दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व संत ज्ञानेश्वर यांच्या प्रतिमेच्या पूजन करून वृक्षारोपणाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थांचे संस्थापक माजी नगराध्यक्ष राजेंद्र झावरे, विश्वस्त विशाल झावरे, मुख्याध्यापक सचिन मोरे, स्थानिक नागरिक, पालक, विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व पालकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्वीडनमधील स्टॉकहोम येथे ५ जून १९७२ रोजी संयुक्त राष्ट्रांची मानवी पर्यावरण विषयक परिषद झाली. या दिवसाचे औचित्य साधून १९७३ मध्ये जगाने आपला पहिला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला. तेव्हापासून दरवर्षी याच दिवशी हा विशेष दिवस साजरा केला जात असतो. त्याच अनुषंगाने संत ज्ञानेश्वर इंग्लिश मिडीअम स्कूल येथे जागतिक पर्यावरण दिन एका अर्थपूर्ण वृक्षारोपणाच्या उपक्रमासह साजरा करण्यात आला.

# मान्सून आधीच पावसाळी रानभाज्या बाजारात

## विक्रीतून महिलांना संसारात लागतोय हातभार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : दरवर्षी जूनच्या पहिल्या पंधरवड्यात मान्सून सक्रिय झाला की, जुलैच्या पहिल्या-दुसऱ्या आठवड्यात रानभाज्या बाजारात विक्रीसाठी येतात. यंदा ८ जूनला मृग नक्षत्र सुरू होत आहे. मात्र तत्पूर्वीच मान्सूनपूर्व अवकाळीने डोंगर माथ्यावर जोरदार हजेरी लावल्याने गुरुवारच्या अकोले आठवडे बाजारात कोळू, शिंदळमाकड, चाईकॉब या रानभाज्या दाखल झाल्यात. रानभाज्या खरेदीसाठी माहीतगार खवय्यांची झुंबड दिसू लागली आहे. आदिवासी महिला रान फिरून रानभाज्या गोळा करतात आणि बाजारात विक्रीसाठी आणतात. भाजी विकण्यासोबत रानभाजीचे औषधी गुण आणि भाजी करण्याची पद्धत आपल्या बोलीभाषेत ते ग्राहकांना सांगतात. दरवर्षी रानभाजी विक्रीतून या



आदिवासी शेतकऱ्यांना बऱ्यापैकी लाभ होतो. मानवी आरोग्यास हितकारक रानभाज्या गर्दणी, टाकळी, बहिरवाडी, उंचखडक आंबिकानगर कळस बुद्रुक व खुर्द, घोरपडावाडी, मांडवदरा, निर्गुडवाडी भागातील आदिवासी महिला रानभाज्या घेऊन विक्रीसाठी येतात. पावसाळ्यात रानात शिंदळमाकड, कोळू, तांदुळचा, चाईकोंब या रानभाज्या उगवणाऱ्या शक्तीवर्धक, आरोग्यवर्धक असून सध्या या भाज्या बाजारात विक्रीसाठी येत आहे. कुरडू, बडदा, भारंबी, चिभूट, आंबटवेल या रानभाज्या दुर्मीळ होत चालल्या आहेत. या रानभाज्यात कार्बोहायड्रेट्स व अँटिऑक्सिडन्ट म्हणून त्या काम करतात. शिंदळमाकड व काटेरी करटुले या रानभाज्या कारल्यासारख्या चवीला कडू असतात. मात्र, या भाज्या पित्तनाशक आहेत. या भाज्या खाल्ल्याने पित्तामुळे होणारी जळजळ, करपट ढेकर आदी विकार कमी होऊन पचनशक्ती वाढते. पोटाचे विकार दूर होतात. अकोलेतील निसर्गात म्हैसवेल, हादगा, चंदनबटवा, आंबटवेल, भोकर, सुरण, कुई, काटेमाठ, हिरवा व लालमाठ, आंबाडी, गुळवेल, चाईबोंडे, भूई-आवळी, बांबूचा कोंब, रानओवा, आंबटचुका, तेहडा, फांदभाजी, रानतोंडली, कोंदुरसा, रानआळू, कडू शेरणी, कडूवाळुक अशा आरोग्यवर्धक भाज्या मिळून येतात.

### पेशीच्या निर्मितीचा वेग वाढवतात.

रानभाज्यांचे महत्त्व आणि त्या तयार करण्याची पद्धत याचा अधिक प्रचार झाल्यास आरोग्यवर्धक पिढी निर्माण होण्यास मदत होईल आणि आदिवासींना आर्थिक उत्पादनाचा स्रोत उपलब्ध होईल. अनेकदा रानभाजी बाजारात विक्रीसाठी येते. पण, काहींना या भाज्यांची माहिती नसते, म्हणून ते विकत घेत नाहीत. त्यामुळे रानभाज्यांचा प्रचार व प्रसारासाठी विशेष मोहीम हाती घेण्याची गरज आहे.

**राधाबाई पथवे, रानभाज्या विक्रेती महिला.**



# बालांगण

## रेखा सुरेख रांगोळी

दोस्तांनो, कोणत्याही मंगलप्रसंगी दारापुढे रांगोळी काढली जाते. तेव्हा तुम्हीही दारापुढे छानशी रांगोळी काढू शकता. सहज, सोपी आणि झटपट रांगोळी कशी काढायची? पाहु या...



**साहित्य:** रंगीत तांदूळ किंवा रंगीत वाळू... मित्रांनो, रांगोळीसाठी रंगीत मीठही वापरता येईल. हे मीठ घरच्या घरी तयार करता येईल. यासाठी घरातलं मीठ घ्या. त्यात थोडे खायचे रंग मिसळा. झालं तुमचं रंगीत मीठ तयार! या मिठाचा वापर करूनही छान रांगोळी तयार करता येईल. पांढरा खडू, वर्तमानपत्राचा कागद, गडद रंगाचा मोठा कागद,गम, ग्लिटर

**कृती:** गडद रंगाचा कागद घ्या. त्यावर खडूने आउटलाईन काढून घ्या.

**करून तर पहा**

आता कागदावर पांढरा गम ओता. त्यावर रंगीत मीठ किंवा वाळूने डिझाईन काढा. एका वेळी एकच रंग घ्या. उर्वरित रंग वर्तमानपत्रावर झटकून टाका. रंगसंगतीसाठी तुम्ही ग्लिटरचा वापर करू शकता. अशाच प्रकारे तुम्ही जमिनीवरही ही रांगोळी काढू शकता. जमिनीवर आवडीची नक्षी काढा. त्यात रंगीत वाळू किंवा मीठ भरा. यासाठी रंगवलेल्या तांदळांचाही वापर करता येईल.

## आगळे विश्व

**अजब गजब**


दोस्तांनो, दोस्तांनो, पृथ्वीवर विविध प्रकारचे प्राणी, पक्षी, किटक आहेत. कोणाचा आकार वेगळा तर कोणाची रचना वेगळी. काही सजीवांचं रक्त पिवळ्या, हिरव्या रंगाचं असतं तर काही सजीवांना पायच नसतात. पृथ्वीवर सजीवांच्या ८७ लाख प्रजाती अस्तित्त्वात असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. या प्रजातींमधले काही सजीव चित्र-विचित्र आहेत. त्यांचा विचारही आपण करू शकत नाही. त्यांचं असे सजीव अस्तित्त्वात आहेत यावरही आपला विश्वास बसू शकणार नाही, अशाच काही सजीवांविषयी...



* थोर्नी डेव्हिल नावाची एक पाल आहे. ती ऑस्ट्रेलियातच आढळते. तिच्या संपूर्ण शरीरावर काटे असतात. त्यामुळे खूपच धोकादायक बनली आहे. तिच्या डोक्यावरचा काटा खूप मोठा असतो. हा काटा म्हणजे दुसरं डोकं आहे की काय, असं वाटतं. ही पाल दिवसभरात हजारो मुंग्या खाऊन टाकते.



* दक्षिण तसंच मध्य अमेरिकेतल्या काही देशांमध्ये पोटू नावाचा पक्षी आढळतो. याच्या त्वचेचा रंग खोडाच्या लाकडासारखा असतो. मान हे या प्राण्यांचं मुख्य वैशिष्ट्य आहे.



* स्टोव्ह पाईप स्पंज नावाचा सजीव समुद्रात आढळतो. या सजीवाचा आकार ट्यूबलाईटसारखा होतो. तसंच तो पाच फूट तीन इंचांपर्यंत उंच होऊ शकतो. हा सजीव शेकडो वर्षं जगू शकतो.



* जपानी स्पायडर क्रॅब हा सुद्धा अनोख सजीव. हा सजीव कोळ्यासारखा दिसत असला तरी तो खेकडा आहे. या खेकड्याचं वजन १८ किलोपर्यंत असू शकतं. तो १०० वर्षांपर्यंत जगू शकतो.



* ब्लॉब फिश हा समुद्रात तब्बल २४०० फूट खोल राहणारा मासा आहे. समुद्राच्या पाण्यापेक्षा कमी वजन असल्याने तो पाण्यात अगदी सहज तरंगू शकतो.

* ऑस्ट्रेलिया आणि न्यू गिनीमध्ये विशिष्ट प्रकारची पाल आढळते. या पालीला फ्रिल नेक्ड लिझार्ड असं म्हटलं जातं. पालीच्या मानेजवळ पंखांसारखा एक भाग असतो. यामुळे ही पाल वेगळी वाटते.

## सॅल्यूट आणि परंपरा

छोट्या दोस्तांनो, कल्पना करा की, भारतीय लष्कर, नौदल आणि हवाई दलाचे जवान सलाम करतात तेव्हा हात वर करण्याची त्यांची पद्धत वेगळी असते. यामागे केवळ परंपरा नाही तर एक विचार आणि इतिहास लपलेला आहे. आज या फरकाबद्दल थोडे तपशीलवार समजून घेऊया.

**आर्मी सॅल्यूट –** भारतीय सैन्याचे जवान सलामी देतात तेव्हा हाताचे तळवे जमिनीकडे झुकलेले असतात. सैनिक ज्या हाताने बंदूक किंवा इतर कोणतेही शस्त्र धरतात त्याच हाताने सलाम करतात. अभिवादन करताना त्यांची सर्व बोटे उघडी असतात. यामागे एक ऐतिहासिक कारणही आहे. प्राचीन काळी युद्धे तलवारी आणि शस्त्रांनी लढली जात असत. तेव्हा तळहात खाली दाखवण्याचा अर्थ सैनिकाच्या हातात शस्त्र नाही असा होत असे. हात रिकामे असणाऱ्या सैनिकावर विश्वास ठेवता येत असे.




**माहिती असू द्या**

**नेव्ही सॅल्यूट –** भारतीय नौदलाची सलामी इतर सैन्यांपेक्षा थोडी वेगळी आहे. यामध्ये तळहात शरीराकडे वळवला जातो. सैनिक उजवा हात ९० अंशाच्या कोनात खाली वाकलेला ठेवतो. याचे कारणही नौदलाच्या परंपरेत लपलेले आहे. पूर्वी खलाशी जहाजे चालवण्यासाठी कठोर परिश्रम करायचे. बहुतेकदा त्यांचे हात खराब असायचे. अशा परिस्थितीत समोरच्या व्यक्तीला अपमान वाटू नये म्हणून त्यांनी उघड्या हातांनी नमस्कार करणे टाळले आणि तळहाता आत ठेवत नमस्कार करण्याची परंपरा स्वीकारली. ही पद्धत अजूनही आदर, नम्रता आणि शिस्तीचे प्रतीक आहे.

**वायुसेना सॅल्यूट –** भारतीय हवाई दलाचा सॅल्यूट सर्वात स्टायलिश आणि अचूक असतो. यामध्ये तळहात सरळ असतो आणि जमिनीपासून सुमारे ४५ अंशांच्या कोनात वर उचलला जातो. हवाई दलाच्या काम करण्याच्या पद्धतीप्रमाणेच हा दृष्टिकोन हुशारी, वेग आणि अचूकता दर्शवितो. हवाई दलाची सलामी जलद, चपळ आणि आत्मविश्वासाने भरलेली असते.

थोडक्यात तिन्ही सैन्यांच्या कार्यशैली, इतिहास आणि मूल्यांनुसार त्यांची अभिवादन करण्याची पद्धत देखील वेगळी आहे. सैन्य जमिनीवर, नौदल समुद्रात आणि हवाई दल आकाशात लढते. त्यांचे प्रशिक्षण, कामाचे वातावरण आणि परंपरा देखील भिन्न आहेत आणि हा फरक त्यांच्या सॅल्यूटमध्ये स्पष्टपणे दिसून येतो.

## शेफ व्हायचंय?

छोट्या दोस्तांनो, तुम्हाला छान छान पदार्थ खायला आवडतात का? हॉटेलमध्ये गेल्यावर मेनू कार्ड हातात घेऊन तुम्हीच खाण्याची ऑर्डर देता का? आपणही एखादा पदार्थ बनवून बघावा,असं तुम्हाला वाटतं का? हॉटेलमध्ये एवढे पदार्थ कोणाच्या देखरेखीखाली तयार होतात, असा प्रश्न पडला आहे का? मुलांनो, हे सगळे पदार्थ शेफच्या मार्गदर्शनाखाली तयार होतात. शेफ या करीअरला आता चांगलंच ग्लॅमर आहे. शेफ बनून तुम्ही मोठ्या हॉटेलमध्ये नोकरी करू शकता. शेफ बनण्यासाठी काय करायला हवं, याविषयी...



शेफ बनण्यासाठी तुमच्याकडे काही कौशल्यं असायला हवीत. स्वयंपाकाची आवड, चवींची जाण, खाण्या-पिण्याची आवड, उत्तम संवादकौशल्य, व्यवस्थापन कौशल्य, आत्मविश्वास, कल्पकता, एकाच वेळी विविध भूमिका पार पाडण्याची क्षमता, नव्या गोष्टी शिकण्याची वृत्ती, स्वयंपाकघरात काम करण्याची तयारी अशी कौशल्यं असल्यास तुम्ही या क्षेत्राची निवड करू शकता.

**कोण होणार?**

आपल्या देशात शेफचं ट्रेनिंग देणाऱ्या अनेक संस्था आहेत. या संस्थांमधून वैयक्तिक प्रशिक्षण घेतलं तर तुम्हाला बरेच लाभ होऊ शकतात. तुमच्याकडे पदवी असेल तर भविष्यात त्याचा लाभ होऊ शकतो. पदवी, पदविका तसंच प्रमाणपत्र अभ्यासक्रम आपल्या देशात उपलब्ध आहेत. यात पदवी आणि पदविका अभ्यासक्रमांना जास्त महत्त्व दिलं जातं. हे अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही सखोल ज्ञान मिळवू शकता. कलिनरी आर्टसमध्ये बीए, हॉटेल मॅनेजमेंटची पदवी, केटरिंगचा डिप्लोमा असे विविध अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

## काय फरक आहे?

**महत्त्वाचे काही...**

छोट्या मित्रांनो, कोणी तुम्हाला वकील आणि बॅरिस्टर यांच्यात काय फरक आहे, असे विचारले तर काय उत्तर द्याल? जाणून घेऊ या.

'वकील' हा शब्द कायद्याचा अभ्यास केलेल्या म्हणजेच एलएलबी पदवी प्राप्त लोकांसाठी वापरला जातो. तो न्यायालयात खटला लढत असो वा नसो... म्हणजेच एखाद्याने कायद्याचा अभ्यास केला असेल तर त्याला 'वकील' म्हणतात. उदाहरणार्थ एखादी व्यक्ती एलएलबी पदवी घेतल्यानंतर एखाद्या कंपनीत कायदेशीर सल्लागार बनली आणि न्यायालयात खटले लढत नसली तरीही तो 'वकील' असतो. एखादा वकील बार कौन्सिलमध्ये नोंदणीकृत होतो आणि त्याला खटला लढण्याची परवानगी मिळते तेव्हा तो 'अॅडव्होकेट' होतो.


'बॅरिस्टर' हा शब्द मात्र ब्रिटिश कायदेशीर व्यवस्थेतून आला आहे. एखादा भारतीय विद्यार्थी इंग्लंडला जातो आणि कायद्याचा अभ्यास करतो (विशेषतः 'बार अॅट लॉ'), तेव्हा त्याला 'बॅरिस्टर' म्हणतात. आपल्या सर्वांना माहीत आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधी वयाच्या १९ व्या वर्षी बॅरिस्टर म्हणून शिक्षण घेण्यासाठी भारत सोडून लंडनला गेले होते. म्हणजे वकील आणि बॅरिस्टर हे एकच आहेत पण भारत आणि इंग्लंडमध्ये या दोन्ही नावांमध्ये फरक आहे.

## नेटवर्कची समस्या आहे?

**टेक फन**

मुलांनो, स्मार्टफोन हा आयुष्याचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. एआय मुळेतर हे उपकरण आणखी शक्तिशाली बनले असल्याचे तुम्ही जाणता. परंतु आजही मोबाईल फोनमध्ये नेटवर्क समस्या दिसून येतात. नेटवर्क समस्यांची अनेक कारणे असतात. पण ती जाणली तर तुमची समस्या झटक्यात दूर होऊ शकते. कसे ते पाहू या.


* डिव्हाइसमध्ये एकाच नेटवर्क ऑपरेटरचे दोन सिम कार्ड वापरत असाल, तर कधीकधी नेटवर्क क्लॅशमुळे नेटवर्क मिळण्यात समस्या येऊ शकते. अशा वेळी तुम्ही एक सिम काही काळासाठी बंद करून तपासले पाहिजे. याच्या मदतीने तुम्हाला नेटवर्कची समस्या दुसऱ्या सिममुळे होत आहे की नाही हे समजेल.



* नेटवर्क प्रकार बदलून देखील नेटवर्क समस्येचे निराकरण करू शकता. यासाठी, सर्वप्रथम मोबाईल सेटिंग्ज मध्ये मोबाईल नेटवर्क प्रेफर्ड नेटवर्कवर जावे लागेल. यानंतर, तुम्ही येथे ५ जी/४जी/३जी/२जी मॅन्युअली बदलू शकता आणि कोणते नेटवर्क स्थिरपणे काम करत आहे ते पाहू शकता.

* कधीकधी फोनमधील एखाद्या सॉफ्टवेअर समस्येमुळे नेटवर्क रिफ्रेश होत नाही. अशा परिस्थितीत तुम्ही 'नेटवर्क सिग्नल रिफ्रेशर' सारखे अॅप्स वापरू शकता. हे अॅप्स मोबाईलला जवळच्या टॉवर्सवरून चांगले नेटवर्क मिळवण्यास मदत करू शकते. जुन्या उपकरणांमध्ये नेटवर्क रिफ्रेश न होण्याची समस्या सर्वात सामान्य आहे.

**ठिपके जुळवा**



## चष्मा ठेवा चकाचक

आजकाल मुलामुलींना अगदी लहान वयापासून चष्मा लागतो. पण चष्मा नेहमी स्वच्छ ठेवणे महत्त्वाचे आहे. अनेकदा घाईघाईत चष्मा कापडाने किंवा इतर कशाने तरी पुसतो. पण यामुळे तो स्वच्छ होण्याऐवजी अधिक खराब होतो. तेव्हा चष्मा नेहमी कसा स्वच्छ, चमकता ठेवावा हे आज जाणून घेऊ या.

स्वच्छ करण्यासाठी प्रथम चष्मा कोमट पाण्याने धुवा. यामुळे काचेवर ओरखडे राहणार नाहीत. आता बोटांवर डिशवॉश घ्या आणि लेन्स तसेच फ्रेमवर हळूवारपणे घासा. नंतर पुन्हा एकदा चष्मा कोमट पाण्याने धुवा. तो फक्त मायक्रोफायबर कापडाने पुसा. पेपर नॅपकीन किंवा घातलेल्या कपड्याने, साध्या कापडाने कधीही तो पुसू नका. असे केल्यास चष्म्यावर ओरखडे उठू शकतात.

साबण आणि कोमट पाण्याव्यतिरिक्त, चष्म्याच्या लेन्स स्वच्छ करण्यासाठी इतर उत्पादनेही उपलब्ध आहेत. जसे की, त्यासाठी ओलसर लेन्स वाइप्स उपलब्ध आहेत. ते तुम्ही कधीही आणि कुठेही वापरू शकता. लेन्स क्लिनिंग सोल्यूशन देखील वापरता येईल. क्लिनरसाठी नेहमी मायक्रोफायबर कापडच वापरा.



**असे का करावे**

फक्त चष्म्याची काचच नाही तर चौकटही स्वच्छ करणे आवश्यक आहे कारण फ्रेम सतत त्वचेच्या संपर्कात असते. स्वाभाविकच धूळ आणि घामामुळे ती जंतूंचे घर बनते. म्हणूनच फ्रेम आणि काच नियमितपणे स्वच्छ करा. काही मुले घाईघाईत चष्म्याच्या काचेवर थुंकून तो स्वच्छ करतात. ही अगदी चुकीची पद्धत आहे. यामुळे चष्मा अधिक खराब आणि वापरण्यास अयोग्य होतो. शिवाय त्यावर जंतूचे प्रमाण कमालीचे वाढते. अशा अस्वच्छ चष्म्यावर अत्यंत धोकादायक बॅक्टेरिया वाढू शकतात आणि स्टेफिलोकोकलसारख्या संसर्गाचा धोकाही वाढतो. असे केल्यास डोळ्यामध्ये संक्रमण होते. एवढेच नाही तर चष्म्याचे नोजपॅड आणि कानाच्या क्लिपचा भागही सर्वात जास्त संक्रमित भाग असतो. म्हणूनच चष्मा वापरत असाल तर तो नीट स्वच्छ करा. कंटाळा करणे आरोग्यास घातक ठरेल.

**चित्र रंगवा**



### पेट केअर

#### प्राण्यांना साप चावला तर...




दोस्तांनो; साप कधीही, कोणालाही चावू शकतो. पण यामुळे गोंधळून जाऊ नका. तुमच्या लाडक्या पाळीव प्राण्याला साप चावला तर घाबरून जाऊ नका. प्राण्याला सापापासून लांब न्या, जमिनीवर ठेवा. शांत करा. त्याला स्थिर ठेवा. जखमेवर बँडेज बांधा. चावलेल्या ठिकाणी पट्टा असेल तर तो काढून टाका. डॉक्टरांकडे न्या.

### खादाडी

#### फ्रेंच टोस्टने भागेल भूक!


छोट्या दोस्तांनो, भूक लागली की तुम्ही फ्रेंच टोस्ट बनवू शकता. यासाठी ब्रेडचे दोन स्लाईस, एक अंडं, पाव कप दूध, थोडी दालचिनी हे पदार्थ घ्या. गॅसवर तवा ठेवा. दूध, अंडं आणि वेलची एकत्र करा. ब्रेडचा तुकडा घ्या. तो अंड्यात बुडवा. आता दुसरी बाजू अंड्यात बुडवा. हा ब्रेड तव्यावर ठेवा. आता दुसरा ब्रेडही अशाच प्रकारे बुडवा. दोन्ही ब्रेड तव्यावर ठेवा. गॅस मध्यम आचेवर ठेवा. एक बाजू ब्राउन झाली की ब्रेड उलटा. दुसरी बाजू ब्राउन होऊ द्या. झाला, तुमचा फ्रेंच टोस्ट तयार.



### स्टडी टिप्स

#### वेगवेगळे विषय अभ्यासा

मुलांनो, अभ्यास करण्याच्या काही शास्त्रीय पद्धतीही आहेत. या पद्धतींचा तुम्हाला फायदा होऊ शकतो. मुलांनो, तुम्ही दिवसभरात एकाच विषयाचा अभ्यास करता. त्याऐवजी वेगवेगळ्या विषयांचा अभ्यास करा. समजा तुम्ही गणित, इतिहास, विज्ञान आणि भूगोल या विषयांची तयारी करत आहात. मग या सगळ्या विषयांचा थोडा थोडा अभ्यास करा. यामुळे तुमचा अभ्यास खूप लवकर होईल. एकाच विषयाचा अभ्यास केल्याने तुमचा गोंधळ होऊ शकतो. म्हणूनच वेळेचं नीट नियोजन करा.



### योगा टाईम

#### रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी...

मुलांनो, तुम्हाला राग येतो का? खूप राग येणंही चांगलं नसतं. रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी काही योगासनं आणि मुद्रा करता येतील. उनमामी मुद्रेमुळे तुमचं मन शांत होईल. ही मुद्रा खूप सोपी आहे. खूप राग येत असेल तर ही मुद्रा नियमितपणे करा. ही मुद्रा करण्यासाठी मांडी घालून बसा. डोळे बंद करा. आपलं सगळं लक्ष भुवयांच्या मध्यभागी केंद्रित करा. काही वेळ या स्थितीत रहा. .

